पंचायती राज समिती
(२०१३-२०१४)

बारावी महाराष्ट्र विधानसभा

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गडचिरोली जिल्हा परिषदेचा सन २००५-२००६ व ठाणे जिल्हा परिषदेचा सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील परिच्छेदाबाबत

सोळावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १९ डिसेंबर, २०१३ रोजी विधानसभेत/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
२०१३

पंचायती राज समिती
(२०१३-२०१४)

बारावी महाराष्ट्र विधानसभा

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गडचिरोली जिल्हा परिषदेचा सन २००५-२००६ व ठाणे जिल्हा परिषदेचा सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील परिच्छेदाबाबत

सोळावा अहवाल

पंचायती राज समिती
(२०१३-२०१४)
(दिनांक २५ सप्टेंबर, २०१३)

समिती प्रमुख

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री.दिलीप माने, वि.स.स.
८. श्री.भारत भालके, वि.स.स.
९. श्री.बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. श्री.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री.संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री.संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१८. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स
२०. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.
२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

निमंत्रित

२६. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री.सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.विलास आठवले, उप सचिव
३) श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
४) श्री.नागनाथ थिटे, अवर सचिव
५) श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी
६) श्री.दिनकर कांबळे,कक्ष अधिकारी

पंचायती राज समिती
(२०१२-२०१३)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. ** श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. * श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. * श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रित

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

*सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

** श्री.जयकुमार रावल, वि.स.स. यांचे सदस्यत्व सभागृहाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित केले आहे.

प्रस्तावना

मी पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा सोळावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१३-२०१४ करिता समिती दिनांक २५ सप्टेंबर, २०१३ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज

संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००५-२००६ व सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदेस दिनांक २९, ३० व ३१ ऑगस्ट, २०१२ रोजी भेट देऊन श्री.किरण कोवे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.रा.सो.महाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, गडचिरोली जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने ठाणे जिल्हा परिषदेस दिनांक १६, १७, १८ व १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी भेट देऊन श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.संजय पंतगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ९ व १० जुलै, २०१३ रोजी जिल्हा परिषद, गडचिरोली तसेच दिनांक २६, २७ जून, २०१३ व दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३ रोजी जिल्हा परिषद, ठाणे संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची/प्रतीनीधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीच्यावेळी श्री.ज.स.सहारिया,अतिरिक्त मुख्य सचिव, श्री.स्वाधीन क्षत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल, श्री.टी.सी.बेंजामीन, अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग डॉ.सुधीर गोयल, अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी व पणन), श्री.एस.एस.संधु, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.उज्जल उके, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग (रोहयो), श्री.प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री.एस.के.मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषी व पदुम विभाग, श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.ना.ना.रौराळे सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.गिरीष भालेराव, सह संचालक (रा.ग्रा.आ.अ.), सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.एस.व्ही.देशपांडे, सह संचालक (अभियांत्रिकी), जीएसडीए, पुणे, डॉ.मल्लीनाथ कळशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.रामचंद्र शं.जाधव, उप सचिव, सार्वजनिक

आरोग्य विभाग, श्री.गो.ग.आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.एकनाथ मोरे, उप सचिव श्री.न.म.शिंदे, उप सचिव, श्री.द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली, श्री.एस.बी.पेजलवार, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली, श्री.एस.पी.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, गडचिरोली, श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,ठाणे, श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता, जि.प. ठाणे, श्री.पी.एल.कवाते, शिक्षणाधिकारी, जि.प. ठाणे श्रीमती सलीमा तडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. ठाणे यांनी गडचिरोली व ठाणे समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबाबत समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनीही साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून समितीला केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्ताबाबतची माहिती परिशिष्टामध्ये दिली आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या गडचिरोली व ठाणे जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी या अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१३-२०१४ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक .... डिसेंबर, २०१३ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेवून संमत केला.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक ... डिसेंबर, २०१३

जयप्रकाश दांडेगावकर
समिती प्रमुख
पंचायती राज समिती

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	प्रकरण क्रमांक (२)	विषय (३)
		प्रकरण एक
		जिल्हा परिषद, गडचिरोली

१.	१.	जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावर असणारी रिक्त पदे
प्रकरण दोन		
		जिल्हा परिषद, ठाणे
२	२.	स्थानिक वाढीव उपकराची थकबाकी
	३.	ठाणे जिल्ह्यातील दुग्धोत्पादन वाढविणेबाबत
	४.	पंचायत समिती, भिवंडी, पंचायत समितीमधील गैरव्यवहाराची प्रकरणे
	५.	अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्त्या शासनामार्फत करणेबाबत
		परिशिष्ट
		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

प्रकरण एक

गडचिरोली जिल्हा परिषद

१.१ जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे भरणे -

जिल्हा परिषदेत मोठ्या प्रमाणावर असणारी रिक्त पदे पंचायती राज समितीने दिनांक २९ ते ३१ ऑगस्ट, २०१२ या कालावधीत जिल्हा परिषद गडचिरोलीला भेट दिली. दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्याअगोदर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांचेबरोबर बैठक घेतली व जिल्ह्यासंदर्भात असणाऱ्या अडचणी, समस्या समजावून घेण्याचा समितीने प्रयत्न केला. बैठकीत कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती यांनी जिल्हा परिषद आणि

पंचायती समिती यामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नाही तसेच लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्य यांनीही गडचिरोली जिल्हा हा नक्षलग्रस्त आहे. एका अधिकाऱ्याकडे अनेक पदांचा अतिरिक्त भार देण्यात आलेला आहे. तसेच जिल्ह्यातील बहुतेक अधिकारी प्रभारी आहेत. तर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेतील आठ खाते प्रमुखांची पदे रिक्त असल्याचे समितीस सांगितले.

१.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२ रोजी सन २००४/२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जि.प.च्या इतर विभागाच्या विभाग प्रमुखांची पदे रिक्त असल्याने समितीला दौऱ्याच्या वेळी परिपुर्ण माहिती मिळू शकली नाही त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा पदभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचा पदभार कृषी विकास अधिकारी यांचेकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) या पदाचा पदभार बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे, शिक्षण अधिकारी या पदाचा पदभार उपशिक्षण अधिकारी यांचेकडे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा या पदाचा पदभार सहायक प्रकल्प अधिकारी यांचेकडे, तर कार्यकारी अभियंता (सिंचन) या पदाचा पदभार उप अभियंता यांचेकडे सोपविण्यात आला होता. समितीकडून जिल्हा परिषदांच्या विविध यंत्रणांना साक्षीच्या वेळी प्रश्नोत्तरे स्वरूपात माहितीची विचारणा करण्यात आली तथापि योग्य उत्तरे (माहिती) मिळाली नाही तर काही वेळा विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली नाही. या संदर्भात समितीने नाराजी व्यक्त केली व यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

१.३ समितीने साक्षीच्या वेळी खालील मुद्दयांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून माहिती मागविली :-

गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश असतांनाही समितीने जिल्हा परिषद, गडचिरोलीला भेट दिली तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक ही महत्वाची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत.

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, गडचिरोलीला भेट दिली तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक २१.०७.२०१२ रोजीपासून बदलीने पद रिक्त होते. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) हे दिनांक ४.७.२०१२ ते १०.०९.२०१२ पर्यंत वैद्यकीय रजेवर होते. अतिरिक्त

मुख्य कार्यकारी अधिकारी हे दिनांक २५.०८.२०१२ ते ०७.१०.२०१२ रोजीपर्यंत वैद्यकीय सबबीवर रजेवर होते. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे पद श्री.मोरे यांचे पदोन्नतीने दिनांक २९.०१.२०११ पासून व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे पद श्री.दुपारे यांचे बदलीने रिक्त होते.

सदर पदे शासन स्तरावरून भरण्यात येत असून सद्य:स्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी हे पदे भरण्यात आले आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हे पद दिनांक ३०.११.२०१२ रोजी पासून सेवा निवृत्तीने रिक्त आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर रुजू झालेले आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ही पदे भरण्यात आलेली आहेत.

सदर रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय ? होय. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हे पदे दिनांक ३०.११.२०१२ रोजी पासून सेवा निवृत्तीने रिक्त झाले. परंतु महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक मविसे१०/२०१२/प्र.क्र.२५२/आस्था-३, दिनांक ७.०३.२०१३ नुसार श्री. व्ही.एस.मुळीक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद सोलापूर यांची बदलीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद गडचिरोली या रिक्त पदी पदस्थापना करण्यात आली असून ते अद्याप पावेतो रुजू झालेले नाहीत.

सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेतील श्रेणी अ,ब,क,ड मधील एकूण मंजूर व रिक्त पदाची संख्या किती आहे.

	गट-अ	गट-ब	गट-क	गट-ड
मंजूर पदे	१५३	२२२	७६९६	७८४
भरलेली पदे	८१	१९७	७२०५	७४२
रिक्त पदे	७२	२५	४९१	४२

१.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

गडचिरोली जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक ९ जुलै, २०१३ रोजी ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांची साक्ष घेतली. समितीने गडचिरोली जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली व पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता समितीने जिल्हा परिषदेला भेट दिली असता त्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वैद्यकीय रजेवर असल्याने ते बैठकीत उपस्थित राहू शकले नाहीत असे

विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. या संदर्भात समितीने अशीही विचारणा केली की, राज्यातील इतर जिल्ह्याची आणि गडचिरोली जिल्ह्याची परिस्थिती वेगळी आहे, अनेक अधिकारी गडचिरोली येथे बदली झाली तर जाण्यास इच्छूक नसतात, बदली झालेल्यांपैकी किती अधिकाऱ्यांना रूजू होण्याचे आदेश देण्यात आले होते आणि त्यापैकी किती अधिकारी रूजू झाले नाहीत यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, श्री.मेश्राम उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण यांना कामावर रूजू होण्याचे आदेश देण्यात आले होते परंतु ते त्यावेळी कामावर रूजू न होता दिनांक ४ ऑक्टोबर, २०१२ रोजी रूजू झाले. प्रकल्प संचालक, डीआरडीए यांना २९ जून, २०१२ रोजी कामावर रूजू होण्याचे आदेश देऊनही ते १ सप्टेंबर, २०१२ रोजी रूजू झाले. बदली झाली त्यावेळी ते चंद्रपूर येथे कार्यरत होते त्यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती मिळावी अशी त्यांची अपेक्षा होती त्यांना गडचिरोली येथे रूजू होण्याचे आदेश देण्यात आले होते असे नमूद करून अधिकाऱ्यांची बदली झाली आणि ते रूजू झाले नाही तर त्यांना निलंबित करण्यात यावे असेही समितीस सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, मागील पाच वर्षात ज्या अधिकाऱ्यांची बदली झाली आणि त्यांनी मॅटमध्ये जाऊन स्थगिती मिळविली अशी किती प्रकरणे आहेत आणि गडचिरोली येथे न जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली किती अधिकाऱ्यांनी बदलीस स्थगिती आणखी याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी, असे समितीने निदेश दिले. अद्याप समितीला माहिती सादर करण्यात आली नाही. श्री.मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची बदली केव्हा झाली, ते कोठे कार्यरत होते, बदली झाल्यानंतर ते रुजू न होण्याची कारणे काय आहेत. त्यांची बदली रद्द झाली काय, त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे काय अशी समितीने विचारणा केली असता श्री. मुळीक, यांनी बदली ७ मार्च, २०१२ रोजी गडचिरोली येथे झाली असुन ते सोलापुर येथे राहत होते तसेच स्थानिक जिल्हा परिषदेने त्यांची बदली करण्यात येऊ नये अशी मागणी केली आहे तसेच तुम्हाला निलंबित का करण्यात येऊ नये असे पत्र त्यांना देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीला सादर केलेल्या लेखी माहितीमध्ये वर्ग-१ ची ७२, वर्ग-२ ची २५, वर्ग-३ ची ४९१ तर वर्ग-४ ची ४२ पदे रिक्त असल्याचे नमूद केले समितीने सदरची बाब गंभीर असल्याने अभिप्राय दिले.

१.५ अभिप्राय व शिफारशी :-

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदेला भेट दिली असता उक्त भेटीच्या वेळी साक्षीत असे सांगण्यात आले की, गडचिरोली जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), शिक्षणाधिकारी आणि प्रकल्प संचालक इत्यादी वर्ग १ च्या प्रवर्गातील विभाग प्रमुखांची अनेक पदे रिक्त असून अशा रिक्त पदांवर अन्य अधिकाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. या अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता समितीला ते पूर्ण माहिती देऊ शकले नाहीत. त्यामुळे समितीला आवश्यक ती माहिती मिळू शकली नाही. तसेच साक्षीत असेही आढळून आले आहे की, जिल्हा परिषदेतील अनेक विभाग प्रमुखांची पदे रिक्त ठेवल्यामुळे येथील प्रशासनावर त्याचा अत्यंत प्रतिकुल परिणाम होत आहे. तसेच जिल्ह्यातील आदिवासी लोकांची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असून त्यांना वरिष्ठ दर्जाचे अधिकारी उपलब्ध होत नसल्याने विविध योजना राबविताना त्यावर परिणाम होतो व जनतेला योग्य न्यायदेखील मिळत नाही. शासनानेदेखील जाणीवपूर्वक अशी पदे अनेक कालावधीपासून रिक्त ठेवल्यामुळे शासनाचे या जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाले आहे असे समितीला खेदाने नमूद करावेसे वाटते.

समितीला असेही आढळून आले की, गडचिरोली जिल्ह्यात बदली झालेले अधिकारी बदलीच्या ठिकाणी विहित कालावधीत रुजू होत नाहीत. तथापि, ते या जिल्ह्यात जाण्यास टाळाटाळ करतात, तसेच विविध कारणे पुढे करुन बदली टाळण्याचा प्रयत्न करतात. गडचिरोली जिल्हा मागास, आदिवासी व नक्षलग्रस्त आणि संवेदनशील असल्याने जिल्ह्याचा विकास जलद गतीने होणे आवश्यक आहे. तथापि विभाग प्रमुखांच्या जागा रिक्त राहिल्याने विकासाची कामे प्रलंबित राहतात. सर्वसामान्य जनतेची कामे वेळेवर होत नाही याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. बदली झालेला अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजू झाला नाही तर शासन अशा अधिकाऱ्याविरुध्द कठोर कारवाई करते. या जिल्हा परिषदेमध्ये श्री.मुळीक, श्री.मेश्राम तसेच अन्य अनेक अधिकाऱ्यांची गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये बदली झाली तरी ते अधिकारी रुजू झाले नाहीत. शासनाने त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक असतानाही त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यांचेवर हेतुपूर्वक कारवाई केली नसल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

जे अधिकारी बदली झाल्यानंतर गडचिरोली जिल्हा परिषदेत बदलीच्या ठिकाणी रुजू होणार नाहीत तसेच गडचिरोली जिल्हा परिषदेत अधिकाऱ्यांची झालेली बदली अधिकाऱ्यांने रद्द करवून घेताना इतर मार्गाने स्थगिती मिळविणे, पदस्थापना नाकरणे अशा कारणे देणाऱ्या व

टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द तात्काळ कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी. तसेच श्री.मुळीक, श्री.मेश्राम आणि इतर अधिकाऱ्यांच्या झालेल्या बदल्यानुसार ते विहीत कालावधीत रुजू न झाल्याने शासनाने त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करावी. तसेच शासनाने प्रथम जे अधिकारी गडचिरोली किंवा नक्षलग्रस्त भागात काम करण्यास तयार असतील त्यांना विचारणा करुन तसेच त्यांचे पसंतीक्रम कटाक्षाने विचारात घेऊन अशा सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची तेथील रिक्त जागा विचारात घेऊन गडचिरोली तसेच इतर जिल्ह्यात प्राधान्याने बदली, पदस्थापना करण्याबाबत नव्याने व स्वयंपूर्ण व स्पष्ट स्वरुपाचे आदेश निर्गमित करावेत अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

प्रकरण दोन
ठाणे जिल्हा परिषद

२.१.१ स्थानिक वाढीव उपकराची थकबाकी :-

ठाणे जिल्हा परिषदेच्या सन २००६-०७ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात जिल्हा परिषदेला पाठविण्यात आलेल्या प्रश्नावली क्र.१ च्या अनुषंगाने दिनांक १६ ते १९ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीत पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

सन २००६-०७ या वर्षात जिल्हा परिषदेला बाबनिहाय किती उत्पन्न अपेक्षित होते व प्रत्यक्षात किती उत्पन्न मिळाले, उत्पन्न कमी मिळाले असल्यास, त्याची कारणे काय आहेत ? यावर जिल्हा परिषदेने सन २००६-०७ या वर्षात जिल्हा परिषदेला खालीलप्रमाणे बाबनिहाय उत्पन्न अपेक्षित होते व प्रत्यक्षात खालीलप्रमाणे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

जमेचे लेखाशीर्ष	सन २००६-०७ या वर्षात अपेक्षित असलेले उत्पन्न	सन २००६-०७ या वर्षात प्राप्त झालेले उत्पन्न	शेरा
१	२	३	४
१. कर व फी	१८०००००	२६,४७,२०६	-
२. स्थानिक उपकर	३७१४५३४३	४११४९६३	जमिन महसूल, वाढीव उपकर, मुद्राक शुल्क जास्त प्राप्त झाले.
३.स्थानिक कर	३७,२१,०९६	३७,२१,०९६	-
४. शासकीय अनुदान	१५,००,०००	१९,०७,५००	सापेक्ष अनुदान जास्त प्राप्त झाले.
५.शासकनाकडून मिळालेली इतर अनुदाने	१३५५९५२६	१२३८१६३९	प्रत्यक्ष झालेल्या खर्चानुसार संबंधित विभागाकडून अभिकरण आकार कमी प्राप्त झाल्याने
६. व्याज	४५६८५	५०१३९	-
७. पोलीस	२०००	१९८४	-
८. वैद्यकीय	१८,००,०००	२८,६५,१८३	-
९.सार्वजनिक आरोग्य	२५,००,०००	३,४७,८९३०	-
१०. शेती	३०००००	२६५९२५	रोप वाटिकेच्या प्रत्यक्ष विक्री कमी झाल्याने.
११. पशुसंवर्धन	१०००	१४९२	
१२. सार्वजनिक बांधकाम	३५४००००	८९०७७१०	
१३. संकीर्ण	४००००००	८५७४३००	
एकूण	**६९९१४६५०**	**८५९५२७३४**	

पंचायत समिती भिवंडी :-

समितीने पंचायत समिती भिवंडीला भेट दिली त्यावेळी भिवंडी पंचायत समितीकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

१) पंचायत समितीचे सन २००६-०७ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न किती होते व उक्त वर्षात कोणकोणत्या बाबींवर किती खर्च झाला ? सन २००८ अखेर पंचायत समितीकडे किती रक्कम शिल्लक होती व रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत ?

पंचायत समितीचे सन २००६-०७ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न खालील प्रमाणे होते.

जमा	
तपशिल	**रक्कम**
आरंभिची शिल्लक	४९१५५९/-
जमिन महसुलावरील सामान्य उपकर	-
एकूण	४९१५५९/-

खर्च	
बाब	**रक्कम**
२ सा.प्र.वि.	८६८३४/-
३ शिक्षण	-
४ बांधकाम	१६८०९१/-
पाणी पुरवठा	४५०००/-
१२ पशुसंवर्धन	९९९०/-
१४ समाजकल्याण	७७१६६/-
१७ महिला व बाल कल्याण	-
एकूण	**३८७०८१/-**

सन २००८ अखेर शिल्लक रु.१२८६१६/- होती. विद्युत जनित्र खरेदी करण्यास परवानगी न मिळाल्यामुळे सार्व.आरोग्याच्या जि.प. स्तरावरुन योजना राबविल्याने व १७ महिला बालकल्याण जि.प. स्तरावरुन योजना राबविल्याने सदरचा खर्च होऊ शकला नाही.

२) सन २०१० अखेरपर्यंत पंचायत समितीला वाढीव उपकराबाबत किती व कोणत्या कालावधीची रक्कम येणे बाकी होती, त्यापैकी किती रक्कम मिळाली व केव्हा ?

सन २०१० अखेरपर्यंत वाढीव उपकराबाबत माहिती खालीलप्रमाणे

लेखाशिर्ष	**कोणत्या कालावधीची रक्कम येणे हाती**	**किती रक्कम येणे होती**	**किती रक्कम प्रत्यक्ष प्राप्त झाली**	**रक्कम केव्हा प्राप्त झाली**
१९६१ च्या नियम (१५५/२) सामान्य उपकर वसुली व १५५ चा (१) (६) वाढीव उपकर वसुली	१/१/०५ ते ३१/१२/०५	७०२२८५/-	७०२२८५/-	३१ मार्च, ०६
	१/१/०६ ते ३१/१२/०६	८७५२२२/-	८७५२२२/-	३१ मार्च, ०७
	१/१/०७ ते ३१/१२/०७	८८३९७३/-	अप्राप्त	
	१/१/०८ ते ३१/१२/०८	८९२७७६/-	अप्राप्त	
	१/१/०९ ते ३१/१२/०९	९८२०५४/-	अप्राप्त	
	१/१/१० ते ३१/३/१०	३२७७४५/-	अप्राप्त	

एकूण		**३७८००४५/-**	**१५७७५०७/-**	

सन २०१० अखेर पंचायत समितीला वाढीव उपकरापोटी र.रु. ३७८००४५/- येणे बाकी होती. पैकी र.रु.१५७७५०७/- प्राप्त झाली. उर्वरित र.रु. २२०२५३८/- सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० या आर्थिक वर्षातील सामान्य व वाढीव उपकर येणे बाकी आहे.

उपरोक्त माहितीच्या आधारे समिती गटविकास अधिकारी, भिवंडी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

२.१.२ (अ) गटविकास अधिकारी भिवंडी यांची साक्ष :-

समितीने दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२ रोजी भिवंडी पंचायत समितीला भेट दिली. समितीने सन २००६-०७ या वर्षामध्ये जमिन महसुलावर सामान्य उपकराचे अनुदान का प्राप्त झाले नाही ? सामान्य उपकर मिळणेबाबत पंचायत समितीने कोणते प्रयत्न केले, तालुकानिहाय जमीन महसूल कर किती येतो अशी समितीने विचारणा केली असता यावर गटविकास अधिकारी, भिवंडी यांनी असे नमूद केले की, सन २००६-०७ मध्ये अनुदान प्राप्त झाले नव्हते, सामान्य उपकर मिळावा म्हणून दिनांक ७ ऑगस्ट, २००७ रोजी आंम्ही जिल्हा परिषदेकडे विनंती अर्जाव्दारे मागणी केलेली आहे. तर दिनांक ५ जानेवारी, २०१० रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे. पंचायत समितीला २२०२५३८/- इतकी रक्कम येणे बाकी आहे, असे नमूद केले. तथापि, उपकर मिळणेबाबत २००७ पासून आजपर्यंत कोणता पाठपुरावा करण्यात आला अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात सन २००७ पासून आतापर्यंत उपकर मिळणेबाबत कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाही असे समितीला सांगितले. तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २००६-०७ मध्ये उपकर मिळालेला नसून जिल्हा स्तरावर याबाबत समित्या कार्यरत असून याबाबतीत आढावा घेऊन समितीला माहिती अवगत केली जाईल असे सांगितले.

२.१.२ (ब) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २००६-०७ या वर्षात जिल्हा परिषदेची उत्पन्नाची साधने कोणती होती ? अशी समितीने विचारणा केली असता यावर मुद्रांक शुल्क, जमिन महसूल, पाणीपट्टी उपकर, व्यवसाय कर अनुदान मोटार वाहन कर, अभिकरण योजनेवरील आकार, वन व महसुल अनुदान या साधनांतून जिल्हा परिषदेला उत्पन्न मिळते असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद करुन जमीन महसुलाबाबत असेही सांगितले की, कायद्यातील तरतुदीनुसार महसूल विभागाकडून गोळा होणारे उत्पन्न जिल्हा परिषदेला अपेक्षित असते. ठाणे जिल्ह्यात सन २००६-२००७ ते २०११-२०१२ या वर्षात बाब निहाय मागणी करण्यात आली होती. महसूल विभागाकडून आकडेवारी गोळा करुन त्याचा ताळमेळ घालून जिल्हाधिकारी, ठाणे यांना ती माहिती सादर करण्यात आली आहे. पूर्वी खर्च झालेल्या रकमेचा आढावा घेऊन मागणी तयार करण्यात आली आहे. सन २००६-२००७ पासून २०११-२०१२ पर्यंत शासनाकडून जिल्हा परिषदेला २२ कोटी २१ लाख रुपये मॅचिंग ग्रन्डपोटी येणे आहे. त्यामुळे समितीला माझी विनंती आहे की, सन २००६-०७ पासून ७१ कोटी २१ लाख रुपयांचे थकित सापेक्ष अनुदान जिल्हा परिषदेला मिळण्यासाठी समितीने शिफारस करावी.

यापूर्वी या सर्व बाबी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वित्त विभाग व माननीय वित्त मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणल्या आहेत. उक्त रक्कम वेळोवेळी मिळाली असती तर जिल्हा परिषदेचा सेस फंडातून अनेक योजना राबविता आल्या असत्या. जिल्हा परिषदेच्या सेस फंड कमी असल्यामुळे लाभार्थ्यांची निवड करण्यावर बंधने येतात. त्यामुळे योजनांवर तरतूद करता येत नाही. याबाबतीत शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला असून तत्कालीन वित्तमंत्री महोदयांसोबत बैठक देखील घेण्यात आली होती. सन २००६-२००७ पासून २०११ पर्यंत मूळ मागणीचा विचार करता सापेक्ष अनुदानाची रक्कम ७१ कोटी २१ लाख रुपयांची आहे. अशा प्रकारची रक्कम सर्वच जिल्हा परिषदांमध्ये असण्याची शक्यता आहे असेही समितीस सागितले. तर मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी असे सागितले की, वाढीव उपकराची रक्कम जिल्हा परिषदेला प्राप्त झाल्यानंतर पंचायत समितीनिहाय आकडेवारी जिल्हाधिकारी यांच्याकडून जिल्हा परिषदेला येते. यामध्ये भिवंडी पंचायत समितीला रक्कम देण्यात आली असून इतर पंचायत समितीच्या संदर्भात निरंक असा शेरा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आला आहे. पंचायत समिती निहाय महसूल गोळा करण्यात येतो. या संदर्भातील तपशील कळवावे असे जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडून रकमेचे वितरण करण्यात येते त्यामध्ये काही पंचायत समित्यांना निरंक रक्कम दर्शविण्यात आली आहे. तसेच सन २०११-१२ या वर्षात किती रकमेचे वाटप करावयाचे आहे याची यादी जिल्हाधिकारी यांनी दिलेली नाही.

ज्या भागातून महसूल कमी गोळा होतो त्या भागाचा विकास होत नाही त्यामुळे महसूल गोळा करणारे अधिकारी व कर्मचारी यास जबाबदार असून यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे असे समितीने अभिप्राय व्यक्त केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही सांगितले की, महसूल गोळा करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीत असलेल्या महसूल विभागाचे आहे. जमीन व वन महसूलावर नियंत्रण उप विभागीय अधिकारी यांचे असते. प्रत्यक्षात महसूळ गोळा करण्याचे काम तहसीलदार यांच्या अंतर्गत तलाठी करीत असतात. त्या त्या वर्षासाठी निधी वितरीत केल्याबाबत जिल्हाधिकारी आदेश काढतात व त्यांचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांना येत असते. या पत्रामध्ये तालुक्याचे नाव, दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबरअखेर वसूल केलेला महसूल, देय अनुदान याबाबतची माहिती दिलेली असते. प्राप्त महसूलातून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ४० टक्के व गट विकास अधिकारी यांना ६० टक्के रक्कम वितरीत करण्यात येते. गेल्या काही वर्षातील आकडेवारी पाहिली तर कल्याण, अंबरनाथ, भिवंडी या तालुक्यांना वितरीत करण्यात आलेला निधी 'निरंक' दाखविण्यात आला आहे.

वास्तविक पाहता, तहलीसदार आणि जिल्हाधिकारी यांना सादर होणाऱ्या प्रत्येक महिन्याच्या माहितीची एक प्रत त्याच वेळी गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माहितीसाठी पाठविली गेली पाहिजे. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, त्या त्या तालुक्यात किती महसूल गोळा झाला, याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार करावा लागतो. कार्यपध्दतीत काही बदल करणे आवश्यक आहेत. उदा. अगोदरच सांगितल्याप्रमाणे किमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे महसुलाबाबतचे त्रैमासिक विवरणपत्र सादर झाले पाहिजे. तसे करणे शक्य नसेल तर गोळा करण्यात आलेल्या महसुलाचा अहवाल तहसीलदार आणि उप कोषागार अधिकारी यांच्यामार्फत त्या त्या गट विकास अधिकाऱ्यांकडे सादर झाला पाहिजे. म्हणजे, गट विकास अधिकाऱ्यांमार्फत ही सर्व आकडेवारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर होऊ शकेल. ही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वेळेवर मिळाली तर त्या आधारावर जिल्हा परिषद आपली मागणी सादर करु शकेल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले.

उपरोक्त प्रकरणी धोरणात्मक निर्णयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली असल्यामुळे कार्यपध्दतीत बदल घडवून आणण्यासाठी त्या संदर्भात ग्रामविकास व महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

२.१.३ समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेतलेल्या साक्षीवरुन खालील मुद्दाबाबत अधिक माहिती मागविली.

जिल्हा परिषदांना शासनाकडून घेणे असलेल्या स्थानिक वाढीव उपकराच्या रकमेचे प्रदान नियमितपणे केले जात नसल्याचे आढळून आले आहे. या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे ? तसेच जि.प./पं.स./ग्रा.प. यांना स्थनिक वाढीव उपकर वेळच्या वेळी मिळण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली ?

उपरोक्त मुद्दांबाबत समितीस जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली. ग्रामविकास विभागामार्फत निर्णय एलएफसी १०९२/सीआर १९६३/२४, दि.२२/०४/१९९२ नुसार पंचायत राज संस्थांना जमिन महसूल अनुदान मंजूर करणे व वितरीत करणे बाबतची सुधारीत कार्यपध्दती विषद केली आहे. तथापि, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत होत नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे या कार्यालयाकडील पत्र क्र.जिपनी २०११/प्र.क्र. ५०७४/वित्त ३१, दि. २१/०१/२०१२ अन्वये सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना या अनुषंगाने सूचित करणेत आले की त्यांचे कार्यालयाने तहसिलदार कार्यालयाकडून सादर होणार उपकर वसुलीचा अहवाल व संबंधित उपकोषागार कार्यालयाकडून जमा पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन त्यानुसार उपकर मागणीची निश्चिती करावी. त्यानुसार उपकराची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे नोंदवावी व त्याची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेस दयावी.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रत्यक्ष वसुलीच्या व उपकोषागार कार्यालयाने प्रमाणित केल्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली मागणी विभागीय आयुक्त कार्यालयाने ग्राम विकास विभागाकडे अर्थसंकल्पाच्या स्वरुपात नोंदवावी म्हणजे सदर मागणीच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागामार्फत वित्त विभागाकडे अनुदानाची मागणी करुन मागणीच्या प्रमाणात अनुदान अर्थसंकल्पीत करुन संबंधित जिल्हा परिषदांना विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत त्याचे वाटप करणे सुलभ होईल.

उपरोक्त प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियमानुसार व विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. वरील बाबींची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. त्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाला परत शासनस्तरावरुन याबाबत सक्त सूचना निर्गमित करणेत येत आहे. तसेच सदर अनुदानाचे जिन्हा परिषदांना वाटप करण्यात आले नंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर अनुदानाच्या पंचायत समिती निहाय उपकर अनुदानाच्या वाटप यादया तात्काळ देणेबाबत देखील जिल्हाधिकारी कार्यालयाला कळविणेत आले आहे.

२.१.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त माहिती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीबाबत समितीने अधिक व वस्तुनिहाय माहिती घेण्यासाठी दिनांक २६ जून,

२०१३ रोजी ग्रामविकास व महसूल या विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदांना शासनाकडून घेणे असलेल्या स्थानिक वाढीव उपकराच्या रक्कमेचे प्रदान नियमितपणे केले जात नसल्याचे आढळून आले असून या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे यावर महसूल विभागाच्या सचिवांनी असे नमूद केले की, जिल्हापरिषदेकरीता महसूल विभागाकडून अनेक विविध प्रकारचा उपकर गोळा केला जातो त्या संदर्भात शासनाने कार्यपध्दती विहीत केलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये पंचायत राज संस्थांना जमीन महसूल अनुदान मंजूर करणे व वितरीत करण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती विषद केलेली आहे. तथापि सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत होत नसल्याचे आढळून आले आहे. या संदर्भात ग्राम विकास विभागाने दिनांक २२ एप्रिल, १९९२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला होता. सदर शासन निर्णयानुसार आता पर्यंत कार्यपध्दती अवलंबली जात होती. या शासन निर्णयामध्ये काही सुधारणा करण्याच्या संदर्भात दिनांक २१ जानेवारी, २०१२ रोजी ग्राम विकास विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव श्री. सुधीर ठाकरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून सुघारणा करण्याची सूचना केली होती.

जमा झालेला जमीन महसूल व वाढीव उपकराची माहिती तहसीलदारांकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवली जाते. जिल्हाधिकारी कार्यालयांच्या प्रत्यक्ष वसुलीच्या व उपकोषागार कार्यालयाने प्रमाणित केल्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली मागणी विभागीय आयुक्त कार्यालयाने ग्राम विकास विभागाकडे अर्थसंकल्पाच्या स्वरुपात नोंदवली जाते. सदर मागणीच्या अनुषंगाने ग्राम विकास विभागामार्फत वित्त विभागाकडे अनुदानाची मागणी करुन मागणीच्या प्रमाणात अनुदान अर्थसंकल्पीय करुन संबंधित जिल्हा परिषदांना विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत वाटप करणे सुलभ होईल. अशा प्रकारे शासकीय यंत्रणा तयार करण्यात आलेली आहे.

उपकराच्या संदर्भात शासनाने असे आदेश दिलेले आहेत की, या संदर्भातील अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. उपकराच्या बाबतची माहिती जिल्हाधिकाऱ्याकडून विभागीय आयुक्त व ग्राम विकास विभागाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. जिल्हा परिषद आपल्या स्तरावरच उपकर प्रदान करु शकते. या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सुचवले आहे की, तहसीलदाराने तयार केलेली माहिती गटविकास अधिकारी व त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे संकलित करण्यात आलेल्या माहितीची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना दिल्यास अधिक चांगल्या प्रकारे ताळमेळ होऊ शकतो ही सूचना अतिशय योग्य आहे. ही सूचना मान्य करण्यास काही अडचण नाही. या करिता शासन निर्णय निर्गमित करावा लागेल. या संदर्भात ग्राम विकास विभागाचा सल्ला घेऊन अंमलबजावणी करण्याकरिता सुरुवात केली जाईल. जमीन महसुलावरील वाढीव उपकर, प्रोत्साहनपर अनुदान

त्याचबरोबर वाढीव उपकर, सापेक्ष अनुदान, नुकसान भरपाई इ. अनेक प्रकारचे अनुदान जिल्हा परिषदांना दिले जातात. प्रोत्साहनपर अनुदान किंवा सापेक्ष अनुदान याकरिता माहिती शासन स्तरावर पाठवावयाची आवश्यकता असल्यास त्याकरिता शासन स्तरावर मंजूरी घेऊन जिल्हापरिषदेला देता येईल. उपकराच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आलेला आहे. त्यांची अंमलबजावणी केली जाईल. दरवर्षी प्रत्येक जिल्हापरिषद व पंचायत समितीमध्ये अनुदान देण्याकरिता काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे असे समितीस सांगितले.

ग्रामविकास विभागाच्या विभागीय सचिवांनी असेही नमूद केले की, सध्याच्या यंत्रणेमध्ये माहिती प्राप्त होण्यामध्ये बराच वेळ लागतो. जिल्हाधिकाऱ्यांकडे माहिती आल्यानंतर ती आयुक्तांकडे पाठविली जाते व नंतर ती शासनाला प्राप्त होते. या ऐवजी माहिती संकलित करुन जिल्हा परिषदेला दिल्यास ती लवकरात लवकर मिळू शकते. या संदर्भात आयुक्त स्तरावर एक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये जिल्हापरिषदेतील सदस्य व उपआयुक्त आहेत. या समितीने विविध विभागांमधील माहिती संकलित करुन पाठवायची असते. निधीच्या नियमित मागणीमध्ये काही अडचण येत नाही. यंदा ९०३ कोटी रुपये थकलेले आहेत. दरवर्षी सर्व जिल्हापरिषदेची मागणी १२०० कोटी रुपये आहे. या वर्षी ८० टक्के निधी देण्याची सूचना वित्त विभागाने केलेली आहे. निधी लवकरात लवकर प्राप्त होण्याकरिता निधीची मागणी अचूक केली जाणे आवश्यक आहे. निधीची मागणी करताना त्याची शहनिशा स्थानिक पातळीवर केली जाणे आवश्यक आहे.

समितीने अशीही विचारणा केली की, उपरोक्त प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे त्यामुळे सदरचा शासन निर्णय केव्हा निर्गमित करण्यात येईल यावर विभागीय सचिवांनी नमूद केले की, या संदर्भात वित्त विभागाशी चर्चा करुन साधारणपणे तीन महिन्यात शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

२.१.५ अभिप्राय व शिफारशी :-

जिल्हा परिषदेला व पंचायत समित्यांना मिळणाऱ्या उत्पन्नापैकी प्रमुख उत्पन्न जमीन महसुलावरील सामान्य उपकर, वाढीव उपकर आणि सापेक्ष अनुदान याव्दारे मिळते. भिवंडी पंचायत समितीला जानेवारी २००७ ते मार्च २०१० पर्यंत अपेक्षित असलेले सामान्य उपकर आणि वाढीव उपकर यापासून मिळणारे सुमारे ३०,६६,५४८/- इतके उत्पन्न प्राप्त झाले नाही. तसेच अबंरनाथ पंचायत समितीला सन २००५ ते २००९ पर्यंत रु. १९६००/-, जव्हार पंचायत समितीला सन २००९ अखेर रु.१००४३/-, कल्याण पंचायत समितीला सन २००९ अखेर रु. ९,२३,४३५/-, वसई पंचायत समितीला सन २००३-०४, २००५ ते २००९ पर्यंत वाढीव उपकराची रक्कम प्राप्त झालेली नाही. विक्रमगड पंचायत समितीला सन २००५ ते २००९ या कालावधीत ४२०००/- इतकी रक्कम येणे होती. त्यापैकी ६७९०/- इतकीच रक्कम प्राप्त झाली. मुरबाड पंचायत समितीला सन

२००५ ते २००९ या कालावधीत १०६०९०८/- इतकी रककम येणे होती. त्यापैकी प्रत्यक्षात २६१०४१/- इतकीच रक्कम प्राप्त झाली. वरीलप्रमाणे वाढीव उपकराची रक्कम संबधित पंचायत समितींना अद्याप प्राप्त झालेली नाही. सदरचे उत्पन्न प्राप्त करुन घेण्यासाठी भिवंडी पंचायत समितीने ऑगस्ट २००७ नंतर जानेवारी २०१० या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेशी कोणताही पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला नाही. तसेच याबाबत जिल्हास्तरावर असणाऱ्या समितीकडून माहिती घेऊन समितीस अवगत केली जाईल असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले. तथापि, अद्याप याबाबत समितीला या संदर्भात माहिती प्राप्त झाली नाही. याप्रकरणी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून भिवंडी पंचायत समितीला सन २००७ पासून आजपर्यंत अनुदान प्राप्त झाले नसल्याने अनुदानाची मागणी का करण्यात आली नाही याची चौकशी करण्यात यावी तसेच जबाबदार असणाऱ्याविरुंध्द कारवाई करण्यात यावी तसेच ठाणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांना येणे असलेली वाढीव उपकराची रक्कम तात्काळ देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात यावेत. समितीला आश्वासित केलेली माहिती संबंधितांना वेळेत देणे आवश्यक असूनही ती न देता समितीला असत्य माहिती देऊन दिशाभूल करणाऱ्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात यावी व यापुढे अशी गंभीर चूक केल्यास त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

जिल्हा परिषदेला आणि पंचायत समितीला स्थानिक कर, वाढीव उपकराव्दारे मिळणारे अनुदान जिल्हाधिकाऱ्याकडून दिले जाते. सन २००७ पासून आजपर्यंत सुमारे २२ कोटी २१ लाख आणि ७१ कोटी २१ लाख रुपये जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हापरिषदेला अनुदान दिले नाही. सदरचे अनुदान न मिळाल्यामुळे त्याचा अनेक योजना राबविण्यावर परिणाम झाला असून अप्रत्यक्षरित्या लाभार्थ्यांवर परिणाम झाला आहे. जिल्हाधिकारी यांनी सदरचे अनुदान का दिले नाही याबाबत मात्र समितीला माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे सदरचे अनुदान देण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निष्काळजीपणा झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे अनुदान मिळावे म्हणून जिल्हा परिषदेने शासनाकडे म्हणजेच वित्त विभाग व वित्त मंत्री यांचे निदर्शनास आणून दिले. तरीही अनुदान प्राप्त झालेले नाही. म्हणजेच शासन पातळीवरसुध्दा याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

महसुल गोळा करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित असलेल्या महसूल विभागाचे असून प्रत्यक्ष महसूल गोळा करण्याचे काम तहसिलदार यांच्या अंतर्गत तलाठी करीत असतात. ज्या भागातून कमी महसूल गोळा केला जातो त्या विभागाचा विकास होत नाही. ज्या प्रमाणात महसूल गोळा होतो त्या प्रमाणात त्या त्या वर्षासाठी जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना अनुदान वितरीत केले जाते. परिणामकारकरित्या महसुल गोळा करण्याचे काम होत नसल्यामुळे कमी

प्रमाणात अनुदान प्राप्त होते याचा परिणाम म्हणून पंचायती समिती क्षेत्रात विकास कामांना निधी उपलब्ध होत नाही. यास जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी हे जबाबदार असून त्यांचेवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

सन २००६-०७ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हा परिषदेला अनुदान वितरीत केले नाही याबाबत चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी तसेच महसुलावरील उपकर वाढीव उपकर आणि सापेक्ष अनुदान हे विहीत कालावधीत जिल्हा परिषदेला देण्याबाबत संबंधितांना आदेश देण्यात यावेत. तसेच जिल्हा परिषदेला मँचिंग ग्रन्डपोटी असणारे रुपये २२ कोटी २१ लाख व सापेक्ष अनुदान रुपये ७१ कोटी २१ लाख थकीत अनुदान तात्काळ जिल्हा परिषदेला देण्यात यावे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा. तहसिलदार कार्यालयाकडून सादर होणारा उपकर वसुलीचा अहवाल व संबंधित कोषागार कार्यालयाकडून जमा पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन त्यानुसार उपकर मागणीची निश्चिती करुन उपकराची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे नोंदवून विभागीय आयुक्त कार्यालय ग्रामविकास विभागाकडे अर्थसंकल्पाच्या स्वरुपात नोंदवून त्यानुसार ग्रामविकास विभागाकडून वित्त विभागाकडे अनुदानाची मागणी केली जाते व त्यानंतर जिल्हा परिषदांना विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक २२ एप्रिल, १९९२ च्या शासन निर्णयानुसार अनुदानाचे वाटप केले जाते. तथापि उपरोक्त नियमानुसार आणि विहीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही होण्यास फारच विलंब लागतो त्यामुळे जिल्हा परिषदांना अनुदानाचे वाटप वेळेत होत नाही याबद्दल समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वास्तविक पाहता, तहलीसदार आणि जिल्हाधिकारी यांना सादर होणाऱ्या प्रत्येक महिन्याच्या अनुदानाची माहितीची एक प्रत त्याच वेळी गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माहितीसाठी पाठविली गेली पाहिजे. परंतु, आज अशी परिस्थिती आहे की, त्या त्या तालुक्यात किती महसूल गोळा झाला, याबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार करावा लागतो. हे वेळकाढूपणाचे धोरण असून समिती याबद्दल नाराजी व्यक्त करते व या अनुषंगाने समिती अशी शिफारस करते की, सद्याच्या यंत्रणेमध्ये माहिती प्राप्त होण्यास बराच कालापव्यय होत असल्यामुळे स्थानिक उपकरासंदर्भातील माहिती जिल्हाधिकाऱ्याकडे आल्यानंतर ती आयुक्तांकडे पाठविली जाते व नंतर ती शासनास प्राप्त होते अशी पध्दत आहे. या ऐवजी स्थानिक उपकरासंदर्भातील सर्व माहिती एकत्रित संकलित करुन ती संबंधित जिल्हा परिषदेला देण्यात यावी. तसेच तहसिलदारांनी तयार केलेली माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविताना त्याची एक प्रत गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविणे बंधनकारक करावे. यासाठी तात्काळ

नव्याने निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

ठाणे जिल्हा परिषद

कृषि व पशुसंवर्धन विभाग (पशुसंवर्धन विभाग)

२.२.१ ठाणे जिल्ह्यात दुग्धोत्पादन वाढविणेबाबत

सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली १ च्या अनुषंगाने ठाणे जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

१. पशुसंवर्धन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत जनावरांचे ठिकठिकाणी मेळावे व प्रदर्शन भरविले जाते, हे खरे आहे काय, असल्यास, त्यामागील उद्देश काय आहे ?

२. सन २००६-०७ मध्ये किती ठिकाणी असे मेळावे व प्रदर्शने भरविण्यात आली व त्याला शेतकऱ्यांकडून कशा प्रकारे प्रतिसाद मिळाला ?

३. वरील कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने सन २००६-०७ मध्ये किती रकमेची तरतूद केली होती व प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आली ?

४. जिल्ह्यामध्ये 'कृत्रिम रेतन केंद्र' सुरु करण्यासंबंधात कोणते निकष ठरविण्यात आलेले आहेत, या निकषानुसार जिल्हा परिषदेमार्फत एकूण किती ठिकाणी कृत्रिम रेतन केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत, या प्रत्येक केंद्रावर दरवर्षी अंदाजे किती खर्च करण्यात येतो ?

५. जिल्ह्यातील किती कृत्रिम रेतन केंद्रे सध्या बंद आहेत व ती बंद पडण्याची कारणे काय आहेत, बंद पडलेली कृत्रिम रेतन केंद्रे पुन्हा सुरु करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे ?

६. जनावरांच्या वैद्यकीय उपचारासाठी जिल्ह्यामध्ये एकंदर (पंचायत समितीनिहाय) किती ठिकाणी पशुवैद्यकीय केंद्र स्थापन करण्यात आली आहेत, किती पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे, जिल्ह्यात नवीन पशुसंवर्धन केंद्रे सुरु करण्यासाठी काय नियोजन करण्यात आले आहे ?

७. अहवाल वर्षात दुभते जनावर गट वाटप करण्याकरिता किती उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती, त्यापैकी किती साध्य करण्यात आली आहेत, साध्य कमी असल्यास त्याची कारणे काय आहेत ?

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

१. पशुसंवर्धन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत जनावरांचे ठिक-ठिकाणी मेळावे व प्रदर्शने भरविले जातात हे खरे आहे. सन २००६-०७ मध्ये जिल्हा परिषद पशुसंवर्धन कार्यक्रमांतर्गत मेळावे प्रदर्शन भरविल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृत्रिम रेतन, खच्चीकरण, साथ-रोग नियंत्रण, जनावरांचे संगोपन, वैरण विकाय या विषयी अत्याधुनिक शास्त्रीय माहिती दिल्याने विशेषत: अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडते व संकरित जनावरे संगोपनाची आवड निर्माण होते. शेतकऱ्यांमध्ये

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाच्या बाबतीत जनजागृती व्हावी, शेतीस पुरक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी ह्या व्यवसायाकडे बघावे या उद्देशाने असे मेळावे भरविले जातात.

२. सन २००६-०७ मध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत १० मेळावे, प्रदर्शने भरविण्यात आले. त्यास शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

पंचायत समिती निहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पंचायत समितीचे नाव	ठिकाण	जनावरांचे/पक्षी संख्या	पशुपालक उपस्थितांची संख्या
१	शहापूर	गेगाव	५७	६०
२	भिवंडी	विश्वगड	३९१	२६७
३	वाडा	जाळे	३७	४०
४	मुरबाड	पिंपळगाव	३१	२०
५	जव्हार	नांदगाव	७९	८०
६	डहाणू	दापचारी	३०	४०
७	पालघर	चहाढे	१०६	८०
८	तलासरी	तलासरी	४१	५६
९	वसई	उमेला	१३१	१०२
१०	कल्याण	पोई	१९७	१२८
एकूण			११००	८७३

३. सन २००६-०७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत वरील कार्यक्रमासाठी तरतूद रु.१.०० लक्ष देण्यात आली. यामधून मेळावे-प्रदर्शनांकरिता रु.९९९७९/- खर्च करण्यात आले.

४. राष्ट्रीय कृषी आयोगाने शिफारशीनुसार बिगर डोंगरी भागात ५००० पशुधन घटकामागे एक कृत्रिम रेतन केंद्र व डोंगरी भागात ३००० पशुधन घटकामागे एक कृत्रिम रेतन केंद्र असणे आवश्यक आहे. शासनाच्या निकषाप्रमाणे ठाणे जिल्ह्यात १४७ कृत्रिम रेतन केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. कृत्रिम केंद्रावर दरवर्षी लागणारा खर्च राज्य शासनामार्फत केला जातो.

५. जिल्ह्यात एकही कृत्रिम रेतन केंद्र बंद नाही.

६. एकूण १४७ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत होत्या.

पंचायत समितीनिहाय पशुवैद्यकीय दवाखान्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	पंचायत	पशुवैद्यकीय	पशुवैद्यकीय	आधारभुत	एकूण

	समितीचे नाव	दवाखाना श्रेणी-१ चे दवाखाने	दवाखाना श्रेणी-२ चे दवाखाने	ग्राम उप केंद्र	
१	कल्याण	३	२	-	५
२	अंबरनाथ	१	४	-	५
३	भिवंडी	८	५	३	१६
४	ठाणे	१	३	-	४
५	मुरबाड	३	१०	१	१४
६	शहापूर	६	७	९	२२
७	वाडा	७	२	५	१४
८	जव्हार	५	५	-	१०
९	विक्रमगड	२	५	-	७
१०	मोखाडा	३	३	-	६
११	डहाणू	५	२	६	१३
१२	पालघर	८	८	-	१६
१३	वसई	४	३	२	९
१४	तलासरी	३	३	-	६
	एकूण	५९	६२	२६	१४७
पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची पदस्थिती खालीलप्रमाणे आहे.					
अ.क्र.	**संवर्ग**	**मंजूर पदे**	**भरलेली पदे**	**रिक्त पदे**	**शेरा**
१	प.वि.अधि.	७३	४८	२५	
२	सहा.प.वि.अधि	१५	१२	३	
३	पशुधन पर्य.	९२	९१	१	

अनुशेषानुसार शासनाकडे ३ नवीन प्रशुवैद्यकीय दवाखाने स्थापन करण्याचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते व ३ पशुवैद्यकीय दवाखाने मंजूर झाले आहेत.

७. सन २००६-०७ मध्ये दुभते जनावर गट वाटप करण्याकरिता आदिवासी उपाययोजनेअंतर्गत व विशेष घटक योजनेअंतर्गत उद्दिष्ट व साध्य यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	दुभते जनावरांचे गट वाटप	उद्दिष्ट	साध्य
१	आदिवासी	प्रत्येक लाभार्थी ५०	५८ म्हैस गट	५८ म्हैस गट

	उपयोजना	% अनुदानावर दोन दुधाळ जनावरे वाटप		
२	विशेष घटक योजना	प्रत्येक लाभार्थी ५० % अनुदानावर तीन दुधाळ जनावरे वाटप	५८ म्हैस गट	५८ म्हैस गट

२.२.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

समितीने दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२ रोजी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ठाणे जिल्ह्यातून एकत्रित होणाऱ्या दुधाचे प्रमाण किती आहे तसेच जिल्ह्यात एकूण किती दुध संकलन केंद्रे सुरु आहेत. यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी असे सांगितले की, ठाणे जिल्ह्यात दुध संकलन केंद्रे फार कमी प्रमाणात आहेत. तर दुध संकलनाची आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही नमूद केले की, ठाणे जिल्ह्यात एकूण ७ आदिवासी तालुके आहेत. तसेच ४ तालुके अंशत: आदिवासी आहेत. येथील लोकांचा पशुधन पाळण्याकडे ओढा नाही. परंतु, आदिवासी शेतकरी किंवा अन्य शेतकऱ्यांना जोडधंदा मिळावा म्हणून पशुधन पाळण्याबाबत जाग्रुती निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे. यासाठी जिल्हा परिषदेने विविध योजना सुरु केल्या आहेत. या योजनांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी एक पुस्तिकादेखील तयार करण्यात आली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

मागील काळात पशुसंवर्धन विभागाची एक नवीन योजना आली होती. त्यासाठी जिल्हाधिकारी आणि आम्ही ठाणे जिल्ह्यातून ५०,००० अर्ज गोळा केले होते. तालुक्या तालुक्यात जाऊन शेतकऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. सर्वांना ही योजना व त्याचे फायदे समाजवून सांगण्यात आले होते. या माध्यमातून आलेल्या अर्जांची छाननी करण्यात येऊन अंतिम यादी तयार करण्यात आली होती. ही योजना राबविण्याबाबतची सर्व पूर्वतयारी आम्ही केली होती. या योजनेसाठी निधी अतिशय कमी मिळाल्यामुळे ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही. या योजनेसाठी निधी वाढवून दिला गेला किंवा आदिवासी विकास विभागाने निधी उपलब्ध करुन दिला तर त्याचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो. कारण, या जिल्ह्यात वर्षातून १ किंवा जास्तीत जास्त २ पिके घेतली जातात. इतर काळात शेतकऱ्यांना कोणताही रोजगार नसतो. या माध्यमातून मला एवढीच विनंती करावयाची आहे की, पशुसंवर्धन विभागाच्या योजनेसाठी आऊट-ले अतिशय कमी आहे तो वाढविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, पशुवैद्यकीय दवाखान्याच्या योजनेतून किती दवाखाने मंजूर

झाले व किती कार्यरत झाले आहे तसेच एका पशुवैद्यकीय दवाखान्याकडे किती कार्यक्षेत्र असते यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी असे सांगितले की, एका पशुवैद्यकीय दवाखान्याकडे ५००० पशु असतात. डोंगरी भागामध्ये एका दवाखान्यामागे ३००० पशु असतात. परंतु गावांमधील पशुधनाची संख्या वेगवेगळी असते. काही गावांमध्ये १०० पेक्षा जास्त पशुसंख्या असते तर काही गावांमध्ये २०० ते ३०० पशुसंख्या असते. १८ व्या पशुगणनेनुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा अनुशेष आहे, ही वस्तुस्थिती आहे असे नमूद केले. या संदर्भात असणाऱ्या त्रुटीबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

२.२.३ समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली.

१. ठाणे जिल्ह्यात वर्षातून एक किंवा जास्तीत जास्त दोन पिके घेतली जातात त्यामुळे शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दूध उत्पादन वाढविणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

२. पशुसंवर्धन विभागाने यापूर्वी जाहिर केलेल्या नाविन्यपूर्ण योजनेची व्याप्ती न वाढविण्याची कारणे काय आहेत व आता सदरची योजना बंद का करण्यात आली याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे अधिकाधिक माहिती प्राप्त झाली.

१. ठाणे जिल्ह्यात शेतकऱ्यांना दुधाचा जोडधंदा म्हणून खालीलप्रमाणे योजना शासनाकडून तसेच जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येत आहेत.

(१) विशेष घटक योजनेअंतर्गत अनु.जातीच्या ७५% अनुदानावर २ दुधाळ गाई अथवा म्हशी पुरवठा करण्यात येतात.

(२) नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत अनु.जाती/जमातीच्या लाभार्थ्यांना ७५% अनुदानावर ६ दुधाळ गाई अथवा म्हशींचा पुरवठा करण्यात येतो तसेच सामान्य लाभार्थ्यांना ५० % अनुदानावर ६ दुधाळ गाई अथवा म्हशी पुरवठा करण्यात येतात.

(३) व्यतिरिक्त जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा परिषद सेस योजना अंतर्गत ५०% अनुदानावर सुधारित जातीच्या २ म्हशींचा पुरवठा करण्यात येतो तसेच ५० % अनुदानावर १ संकरीत गाईचा प्रती लाभार्थी पुरवठा करण्यात येतो.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातून ५००० अर्ज प्राप्त झाले होते परंतु प्रत्यक्षात तरतुदी पुढीलप्रमाणे प्राप्त झाल्या होत्या. सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी रुपये ६५.६३ लक्ष तसेच अनु.जाती लाभार्थ्यांकरिता रुपये ७.५४ लक्ष अनुदान उपलब्ध झाले, त्यांत सर्वसाधारण ३८ लाभार्थी व अनु. जातीच्या ३ लाभार्थ्यांना

लाभ देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने इच्छुक लाभार्थ्यांची संख्या जास्त व त्या तुलनेत निधीची उपलब्धता कमी असल्यामुळे योजनेची व्याप्ती वाढविता आली नाही. सन २०१२-२०१३ मध्ये प्राप्त तरतूद सर्व साधारण लाभार्थ्यांकरिता रुपये १६९.२७ लक्ष तसेच अनु.जाती लाभार्थ्यांकरिता रुपये १२.५७ व अनु.जमाती लाभार्थ्यांकरिता रुपये १००.५६ लक्ष अनुदान उपलब्ध होते. त्यामधून सर्वसाधारण ७३ लाभार्थी अनु.जाती ५ लाभार्थी व अनु.जमाती ४० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून सद्यस्थितीत योजना कार्यान्वित आहे.

२. सन २०११-१२ मध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत नाविन्यपूर्ण योजनेची व्यापक प्रमाणावर प्रसिध्दी केली त्या अनुषंगाने जिल्ह्यातून ५००० अर्ज प्राप्त झाले होते परंतु प्रत्यक्षात तरतुदी पुढील प्रमाणे प्राप्त झाल्या होत्या.

सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी रुपये ६५.६३ लक्ष तसेच अनु.जाती लाभार्थ्यांकरिता रुपये ७.५४ लक्ष अनुदान उपलब्ध झाले, त्यांत सर्वसाधारण ३८ लाभार्थी व अनु.जातीच्या ३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने इच्छुक लाभार्थ्यांची संख्या जास्त व त्या तुलनेत निधीची उपलब्धता कमी असल्यामुळे योजनेची व्याप्ती वाढविता आली नाही. सन २०१२-१३ मध्ये प्राप्त तरतुद सर्वसाधारण लाभार्थ्यांकरीता रुपये १६९.२७ लक्ष तसेच अनु.जाती लाभार्थ्यांकरिता रुपये १२.५७ लक्ष व अनु.जमाती लाभार्थ्यांकरिता रुपये १००.५६ लक्ष अनुदान उपलब्ध होते. त्यामधून सर्वसाधारण ७३ लाभार्थी, अनु.जाती ५ व अनु.जमाती ४० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून सद्यस्थितीत योजना कार्यान्वित आहे.

२.२.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

ठाणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ जून, २०१२ रोजी कृषि व पदुम (पशुसंवर्धन) आणि आदिवासी विकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ठाणे जिल्ह्यात वर्षातून एक किंवा जास्तीत जास्त दोन पिके घेतली जातात. त्यामुळे शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दुध उत्पादन वाढविणेबाबत शासनाचे धोरण काय आहे यावर विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दूध उत्पादन वाढविण्यासंबंधी शासनाकडून तसेच जिल्हा परिषदेमार्फत योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर २ दुधाळ संकरित गाई अथवा म्हशींचा पुरवठा करण्यात येतो. ही राज्यस्तरीय योजना आहे. नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत सर्वसाधारण गटाला ५० टक्के अनुदानावर ६ दुधाळ गाई अथवा म्हशींचा पुरवठा करण्यात येतो. ७५ टक्के अनुदानावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या

व्यक्तींना ६ गाई अथवा म्हशींचे वाटप केले जाते. ठाणे जिल्ह्यात ५० टक्के अनुदानावर १ संकरित गाय प्रति लाभार्थ्यांना देण्यात येते. ठाणे जिल्ह्यात ७३ लाभार्थी निवडलेले आहेत. अनुसूचित जाती-५ आणि अनुसूचित जमाती ४०, सर्वसाधारण योजनेत ११८ लाभार्थी जिल्हा वार्षिक योजनेत अनुसूचित जातीचे ११७ इ. अशाप्रकारे आपण जवळपास ४०० लाभार्थ्यांना कव्हर केलेले आहे. गेल्यावर्षी ३० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होता. यावर्षी ६० कोटी रुपये निधी दिलेला आहे. ही योजना सर्व ठिकाणी यशस्वी झालेली आहे. ज्या ठिकाणी दुष्काळ पडला आहे ते जिल्हे वगळता बाकी इतर ठिकाणी ही योजना राबविण्याबाबत मंत्रिमंडळाने मान्य केले आहे. यावर्षी दुष्काळामुळे निधीला कपात लावण्यात आलेली आहे. पुढील वर्षी निधीमध्ये वाढ करुन ही योजना चांगल्याप्रकारे राबविली जाईल.

जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे त्याठिकाणी पुढील वर्षी वाढ करण्यात येऊन जवळपास १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल असे नमूद केले. समितीने अशीही विचारणा केली की, ठाणे जिल्ह्यात डहाणू, जव्हार, शहापूर, मोखाडा आदि एकूण ७ आदिवासी तालुके असून आदिवासीच्या संख्येच्या प्रमाणात तरतूद अत्यंत कमी करण्यात आलेली आहे. आदिवासी शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी ही योजना अधिक सक्षमरित्या राबविण्याबाबत जिल्हा परिषदेतर्फे कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत तसेच लाभार्थींची संख्या केवळ ४०० दाखविण्यात आलेली असून या योजनेत अदिवासींचा कुठेही उल्लेख नाही. तसेच अनेक वेळी असे निदर्शनास येते की, लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे दिल्यानंतर लाभार्थी ती जनावरे विकतात तसेच बोगस खरेदी केली जाते त्यामुळे ही दुधाळ जनावरे शेतकऱ्यांकडे असतात की नसतात, याचे सर्व्हेक्षण करण्यात येते काय ? यावर विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, एकूण लाभार्थ्यापैकी आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ४० असून लाभार्थी संख्या वाढविण्यासाठी निधी वाढूवन देण्यात येईल तसेच आदिवासी विकास विभागाकडे अधिकच्या निधीची मागणी करण्यात येईल असे नमूद करुन आदिवासी विकास विभागाकडून लाभार्थ्यांकडील जनावरांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच चारा उपलब्धतेसाठी प्रकल्प अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने चारा उपलब्ध करुन देण्याची योजना आखलेली आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही नमूद केले की, समितीच्या मताशी सहमत असून मागील महिन्यांमध्ये दुघाळ जनावरांच्या वाटपासंबंधीचे सर्व्हेक्षण केले असता दोन तृतीयांश लाभार्थ्यांकडे जनावरे आढळून आलेली नाहीत त्यामुळे प्रत्यक्षात तपासणी केल्याशिवाय परिस्थिती समजणार नाही.

२.२.५ अभिप्राय व शिफारशी :-

ठाणे जिल्ह्यात ७ पूर्ण तर ४ अंशत: आदिवासी तालुके आहेत. जिल्ह्यात वर्षातून १ किंवा जास्तीत जास्त दोन पिके घेतली जातात. इतर काळात शेतकऱ्याला कोणताही रोजगार नसतो त्यामुळे शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून दुध उत्पादनाचा धंदा करणे अत्यंत आवश्यक आहे. या

संदर्भात शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, हा विषय आहे. अधिकाऱ्यांकडून असे सांगितले जाते की, त्यांनी या दृष्टीने अनेक प्रयत्न केले आहेत. पंरतु, स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिष्देचे पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन, त्यांचाही या प्रयत्नात सहभाग घेऊन ही योजना राबविली गेली असती तर निश्चितपणे ग्रामीण आणि आदिवासी भागामध्ये चांगला प्रतिसाद मिळू शकला असता. शेती आणि शेतीला पुरक ठरणारे जोडधंदे हा विषय अशा पध्दतीने हाताळण्याची आवश्यकता आहे. या माध्यमातून ग्रामीण आणि आदिवासी भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न निश्चितपणे वाढू शकते. एखादे पीक घेतल्यानंतर शेतकरी या भागातून रोजगारासाठी अन्य जिल्ह्यात स्थलांतर करतात. हे शेतकरी ८-८ महिने स्थलांतरिताचे जीवन जगतात. ही परिस्थिती या माध्यमातून बदलणे आवश्यक आहे. शेती आणि शेतीला पूरक ठरणारे जोडधंदे, पशुधन विकास, दुग्धोत्पादन व अन्य जोडव्यवसाय यांची ग्रामीण आणि आदिवासी भागासाठी अत्यंत आवश्यकता आहे. या कार्यक्रमासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी दिला पाहिजे. कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला पाहिजे. त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने हे कार्यक्रम राबवित असताना आणि लोकसहभागाची अपेक्षा करताना लोकप्रतिनिधींचाही सहभाग घेतला पाहिजे.

समितीला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जिल्ह्यात जनावरांचे एकूण १० मेळावे घेण्यात आले असून त्यासाठी सुमारे १ लाख इतका खर्च करण्यात आला. तथापि, सदरच्या मेळाव्याने शेतकऱ्यांमध्ये किती प्रमाणात जागृती झाली याबाबतची माहिती देण्यात आली नाही समितीने जिल्ह्याला दिलेल्या भेटीच्या वेळी घरोघरी दुग्ध उत्पादन घेण्यात येते अशी परिस्थिती दिसून आली नाही किंवा माहिती प्राप्त झाली नाही. यावरुन जिल्हा परिषदेने घेतलेल्या मेळाव्यातून शेतकऱ्यांमध्ये जागृती झाल्याचे दिसून येत नाही. या अनुषंगाने जिल्ह्यात **दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी व आदिवासी तथा मागासवर्गीय यांना जोड धंदा म्हणून दुग्ध व्यवसायाचे महत्व पटवून देण्याच्यादृष्टीने जिल्ह्यात वर्षातून किमान दोन मेळावे आयोजित करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी जिल्हा परिषदेकडून व शासनाकडून फारच कमी प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्यामुळे वर्षाचे उद्दिष्ट साध्य होत नाही. राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण योजनेत शेतकऱ्यांकडून जिल्हा परिषदेकडे सुमारे पन्नास

हजार अर्ज प्राप्त झाले. परंतु निधी उपलब्ध नसल्याने सदरची योजना कार्यान्वित होऊ शकली नाही. त्यामुळे सुमारे पन्नास हजार शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित राहावे लागले. इतक्या मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होऊनही तसेच लाभार्थी संख्या जादा असूनही त्या दृष्टीने जिल्हा परिषदेकडून कार्यवाही झालेली नाही. त्यासाठी अपेक्षित असणारा निधी जिल्हा परिषद, कृषी व पदूम (पशुसंवर्धन) आणि आदिवासी विकास विभागाने उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही केल्याची माहितीदेखील समितीसमोर आलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून प्राप्त झालेल्या अर्जावर वेळीच निर्णय घेतला असता तर जिल्ह्यातील सुमारे पन्नास हजार शेतकऱ्यांना दुधाळ जनावरे मिळून त्याचा त्यांच्या उदरनिर्वाहासाठी लाभ होऊन काहीअंशी दारिद्र्य कमी झाले व लोकांची प्रगती होऊन त्यांचे जीवनमान ऊंचावले असते. सबब **ठाणे जिल्ह्यातील आदिवासी तसेच मागासवर्गीय लोकांची संख्या विचारात घेता शासनाने उक्त योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करुन लाभार्थ्यांना त्याचा लाभ देण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी अशीही समितीची शिफारस आहे.** याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.

जिल्हा परिषद ठाणे

२.३.१ पंचायत समिती भिवंडी मधील गैरव्यवहाराची प्रकरणे :-

ठाणे जिल्हा परिषदेच्या सन २००६-०७ या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्र.२ च्या संदर्भात पंचायत समिती, भिवंडी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

अ) पंचायत समितीमध्ये सन २००६-०७ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकीस आली, प्रकरण निहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गुंतलेली रक्कम तसेच अधिकारी/कर्मचारी किती आहेत व यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली ?

ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणांची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यावाहीसाठी पाठविण्यात आली ?

क) सन २००६-०७ पूर्वी उघडकीस आलेली, परंतु अद्याप निकालात न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

ड) वरील 'क' मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे केव्हा पासूनची आहेत ?

उपरोक्त प्रकरणी गटविकास अधिकारी, भिवंडी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा प्राप्त झाला.

अ) पंचायत समितीमध्ये सन २००६-०७ मध्ये गैरव्यवहाराची एकूण १२ प्रकरणे उघडकीस आली.

अ.क्र.	ग्रामपंचायतीचे नाव	योजना	गुंतलेली रक्कम			अपहाराचे स्वरुप	जबाबदार अधिकारी/कर्मचारी	केलेली कार्यवाही
			कायम	संशयित	एकूण			
१	२	३	४	५	६	७	८	९
१	सुरई	ग्रामनिधी	६७६५	१५०००	२१७६५	वसुल रकमेच्या कमी जमा, प्रमाणकशिवाय खर्च	श्री.मनोज दळवी ग्रासे, श्री.व्ही.के.जाधव ग्रासे	जाक्र.पंसभि/ग्राप/अपहार/ वशी/१०७ दि.१४/०९/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
२	आलिमघर	ग्रामनिधी	-	३६०४६	३६०४६	प्रमाणकशिवाय खर्च	श्री.व्ही.एस.सावंत ग्रासे	जाक्र.पंसभि/ग्राप/अपहार/वशी/१०७ दि.१४/९/२०१२ अन्वये संबधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
३	अनगांव	ग्रामनिधी	-	२२१२०	२२१२०	प्रमाणकशिवाय खर्च	श्री.आर.एल. जाधव, ग्रासे	जाक्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/१७४ दि.४/७/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

४	नांदिठणे	ग्रामनिधी	१४००	-	१४००	वसुल रकमेच्या कमी जमा	श्री.आर.एल. जाधव, ग्रासे	जाक्र.पंसभि/ग्रापं/वशी/२०१२/ दि.३/१२/२०११ अन्वये जिल्हा स्तरावर पाठविण्यात आलेली आहे.
५	लाखिवली	जरोयो	८३३१८	-	८३३१८	मुल्यांकनापेक्षा ज्यादा खर्च	श्री.एस.डी.पारडे ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/१०७ दि.१४/९/२०१२ अन्वये संबधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
६	चावे भरे	जरोयो	-	३०००	३०००	प्रमाणकाशिवाय खर्च	श्री.संजय भोईर ग्रासे व सरपंच	जाक्र./पंसभि/ग्रापं/वशी९२ (३) २०११ दि.१५/९/२०११ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
७	पाये	जरोयो	-	६८७९५०	६८७९५०	प्रमाणकाशिवाय खर्च	श्री.जी.के.कासार ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/१०७ दि.१४/९/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
८	नांदिठाणे	जरोयो	-	३९८०	३९८०	रोखवहीत हिशोबाच्या नोंदी न केल्याबाबत	श्री.बी.के.पाटील ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्रापं/वशी/९२ (३)/ २०११ दि.१५/९/२०११ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
९	गाणे फिरींगपाडा	जरोयो	-	२४८१६४	२४८१६४	रोखवहीत हिशोबाच्या नोंदी न केल्याबाबत	श्री.आर.बी.खडसे ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्राप/अपहार/वशी/ १०७ दि.१४/९/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
१०	पुंडास	जरोयो		१०६५००	१०६५००	रोखवहीत हिशोबाच्या नोंदी न केल्याबाबत	श्री.डी.जी.तुरबाडकर ग्रासे व सरपंच	जा.क्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/ १७४ दि.१४/७/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
११	लाब बु	जरोयो	-	४००००	४००००	रोखवहीत हिशोबाच्या नोंदी न केल्याबाबत	श्री.संगारे ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/ १७४ दि.४/७/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.
१२	भादाणे	जरोयो	२१५४५	-	२१५४५	मुल्यांकनाशिवाय ज्यादा खर्च	श्रीम.पी.पी.मानकर ग्रासे व सरपंच	जाक्र.पंसभि/ग्रापं/अपहार/वशी/ १७४ दि.४/७/२०१२ अन्वये संबंधित ग्रासे व सरपंच ग्रामपंचायत यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

ब)

अ.क्र.	सन २००५-०६ अखेर प्रलंबित प्रकरणे	२००६-०७ मध्ये उघडकीस आलेली प्रकरणे	एकूण प्रकरणे	निकाली प्रकरणे	जि.प.कडे पाठविलेली प्रकरणे	पं.स.कडे प्रलंबित प्रकरणे
१	ग्रामनिधी-१२२	४	१२६	६४	४१	२१

२	ज.रो.यो.-८३	८	९१	५८	११	२२
	एकूण- २०५	१२	२१७	१२२	५२	४३

क) ग्रामनिधीच्या १२६ प्रकरणांपैकी ६४ प्रकरणे समायोजित/वसुली करुन निकाली काढण्यात आलेली आहेत. उर्वरित ६२ प्रकरणांपैकी ४१ प्रकरणांची पुर्तता करण्यात आली असून अंतिम स्विकृती पत्राबाबत कार्यवाही चालु आहे व १८ प्रकरणे पं.स.स्तरावर प्रलंबित आहेत. सन २००६-०७ मध्ये उघडकीस आलेल्या तीन प्रकरणांमधील जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

जवाहर रोजगार योजनेच्या ९१ प्रकरणांपैकी ५८ प्रकरणे समायोजित/वसुली करुन निकाली काढण्यात आलेली आहे. उर्वरीत ३३ प्रकरणांपैकी ११ प्रकरणांची पुर्तता करण्यात आली असून त्यांच्या अंतिम स्विकृती पत्राबाबत कार्यवाही चालू आहे व १४ प्रकरणे पं.स. स्तरावर प्रलंबित आहेत. तसेच सन २००६-०७ मध्ये उघडकीस आलेल्या जरोयोच्या ८ प्रकरणांमधील जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

ड) वरील क मधील प्रकरणापैकी जुन्यात जुने प्रकरण सन १९७१ चे ग्रामपंचायत लोनाड चे आहे.

२.३.२ गटविकास अधिकारी भिवंडी यांची साक्ष :-

समितीने दिनांक १६ ते १९ ऑक्टोबर, २०१२ या कालावधीत ठाणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायत समिती, भिवंडीला भेट देऊन गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामनिधीच्या अपहाराची एकूण किती प्रकरणे होती तसेच त्यामध्ये एकूण किती रक्कम गुंतलेली आहे यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस सांगितले की, सन २००५-०६ अखेर ग्रामनिधीची एकूण १२२ प्रकरणे, सन २००६-०७ मध्ये उघडकीस आलेली ४ प्रकणे अशी एकूण १२६ प्रकरणे होती. त्यापैकी ६४ प्रकरणे समायोजित/वसुली करुन निकाली काढण्यात आली. उर्वरित ६२ प्रकरणांपैकी ४१ प्रकरणांची पूर्तता करण्यात आली असून अंतिम स्विकृती पत्राबाबत कार्यवाही सुरु आहे. १८ प्रकरणे पंचायत समिती स्तरावर प्रलंबित आहेत. तसेच २००६-०७ मध्ये उघडकीस आलेल्या ३ प्रकरणांमधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आली आहे असे नमूद केले. तसेच मार्च, २०१२ अखेर ग्रामनिधीच्या अपहराची एकूण किती प्रकरणे आहेत व त्यामध्ये एकूण किती रक्कम गुंतलेली आहे अशी समितीने विचारणा केली असता याबाबतची सविस्तर माहिती समितीला नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे गटविकास अधिकारी यांनी समितीस सांगितले. अहवाल वर्षी पंचायत समितीमध्ये गैरव्यवहाराची एकूण १२ प्रकरणे उघडकीस आली असून संबंधित ग्रामसेवकांविरुध्द आत्तापर्यंत

कोणतीही कारवाई न करता समिती भेट देणार आहे म्हणून दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजी सर्वांना फक्त नोटीस देण्यात आली आहे. संबंधित १२ ग्रामसेवकांना निलंबित केल्यास ७५% वेतन द्यावे लागेल त्यामुळे वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही करावी, तसेच सव्वादोन वर्षाच्या कालावधीत कोणतीही कारवाई केली नसल्याने या प्रकरणांची सखोल चौकशी करुन समितीला सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले व या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असा निर्णय घेतला. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदेशानुसार कार्यवाही केली जाईल असे समितीस सांगितले.

२.३.३ समितीने साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली.

१. पंचायत समितीमध्ये एकूण गैरव्यवहाराच्या प्रकरणांपैकी आजपर्यंत एकूण किती प्रकरणे निकाली काढली तसेच उर्वरीत प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत ? प्रलंबित प्रकरणांची तपशिलवार माहिती देण्यात यावी.

२. गैरव्यवहार केलेल्या ग्रामसेवकांना फक्त नोटीस देण्यात येते परंतु त्यांचेवर कारवाई करण्यात येत नाही, अशा ग्रामसेवकांबाबत त्यांची कायमस्वरुपी एक वेतनवाढ रोखण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

३. मार्च, २०१३ अखेर ग्रामनिधीच्या अपहाराची एकूण किती प्रकरणे होती त्यामध्ये किती रक्कम गुंतली आहे याची तपशिलवार माहिती देण्यात यावी.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे अधिक माहिती प्राप्त झाली.

१. पंचायत समितीमध्ये ग्रामनिधीची एकूण १२२ प्रकरणे होती पैकी ६४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरीत ५८ प्रकरणांपैकी ४० प्रकरणांची पुर्तता करण्यात आली आलेली आहे. उर्वरीत १८ प्रकरणे प्रलंबित असून सदर प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच जवाहर रोजगार योजनेची एकूण ८२ प्रकरणे होती. पैकी ५६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून प्रलंबित २६ प्रकरणांपैकी ११ प्रकरणे पुर्तता करुन जि.प. स्तरावर अंतिम निकाली काढण्यासाठी प्राप्त झाली आहेत. उर्वरीत १५ प्रकरणे पं.स. स्तरावर प्रलंबित असून सदरची प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. गैरव्यवहार केलेल्या ग्रामसेवकांना नोटीस देण्यात येऊन त्यांची एक वेतनवाढ (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) रोखण्यात आलेली आहे.

३. मार्च, २०१३ अखेर ग्रामनिधीची अपहाराची एकूण ५८ प्रकरण प्रलंबित आहेत. त्यामध्ये र. रु.८१७२४७.२९ कायम स्वरुपाची व रक्कम रु. २६६५७९०.१६ संशयीत एकूण र. रु. ३४८३०३७.४५ अशी आहे.

२.३.४ विभागीय सचिवांची साक्ष :-

समितीने ठाणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी भिवंडी पंचायत समितीला दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक २७ जून, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या नोटीसाचे स्वरुप काय आहे त्यास त्यांनी उत्तर दिले काय, उत्तरासाठी किती दिवस देण्यात आले ? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपहाराच्या प्रकरणांची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी अशा स्वरुपाच्या नोटीसा देण्यात आलेल्या असून दिलेल्या नोटीसांची मुदत दहा दिवसांची होती. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी अद्याप नोटीसांना उत्तरे दिलेली नाहीत. यावर समितीने विचारणा केली की, समितीने दिलेल्या निदेशानुसार आपण त्यांना दिलेल्या नोटीसेला दहा दिवसांची मुदत दिली होती त्यांनी दहा दिवसात खुलासा करणे आवश्यक असतानाही दहा महिने होऊन गेले तरी देखील उत्तरे दिलेली नाहीत त्यामुळे समितीने दिलेले निदेशांची त्यांनी गंभीर दखल घेतलेली नाही त्यांना आजच निलंबित करण्यात यावे. अशी विचारणा केली असता संबंधितांचा खुलासा आला नसेल तर निलंबित करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असेही सांगितले की, समितीने निदेश दिल्यानंतर त्याच अधिकाऱ्याकडून कार्यवाही करण्यात आलेली असल्यामुळे आमची शिक्षा सौम्य करावी अशी विनंती करण्यात आलेली आहे. या संदर्भात त्यांनी नियमानुसार काम न करता कामात हलगर्जिपणा केल्याचे सिध्द होत आहे. हा विषय गंभीर स्वरुपाचा असल्याने समितीने १२ ग्रामसेवकांना निलंबित करावे असे निदेश दिले. तथापि, ग्रामसेवकांना निलंबित केलेतर, ७५% पगार द्यावा लागतो. त्यामुळे ग्रामसेवकाची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, ९ जणांची वेतनवाढ रोखण्यात आली असून दोघे सेवानिवृत्त आहेत व १ मयत आहे.

संपूर्ण राज्यामध्ये ग्रामनिधीची रक्कम सरपंच काढतात आणि गैरव्यवहार करतात त्यामुळे ३ ते ४ लाखांची कामे होत नाहीत. या ठिकणी ग्रामनिधीची २४० प्रकरणे असून निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे झालेली नाहीत या संबंधी आपण काय करणार आहात अशी समितीने विचारणा केली असता, अशा प्रकारामध्ये पोलिस केस दाखल करण्यात येते. सदरचा निधी ठराविक कामासाठी आलेला असून तो पुन्हा देता येत नाही. सरपंचाने पैसे हडपले तर त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येतो यामध्ये ग्रामपंचायतीचे नुकसान होते. जबाबदार असणाऱ्यांना कडक शिक्षा केली पाहिजे. अशा प्रकरणात पोलिस केस नोदविणे आवश्यक असून गुंतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करावी अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.३.५ अभिप्राय व शिफारशी :-

२००६-०७ या अहवाल वर्षात पंचायत समितीमध्ये गैरव्यवहाराची एकूण १२ प्रकरणे उघडकीस आली असून समिती जिल्हा परिषदेला भेट देईपर्यंत उक्त प्रकरणांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच समितीने भेट दिल्यानंतर संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांची कायम स्वरुपाची एक वेतनवाढ थाबविण्यात यावी असे समितीने निर्देश दिल्यावरही जिल्हा परिषदेने कार्यवाही केली नाही. विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी सुध्दा त्यांचे कारवाई करण्यात आली नाही. म्हणजेच समितीने प्रत्यक्ष भेट आणि निदेश देऊनही त्याची जिल्हा परिषदेने अंमलबजावणी केलेली नाही ही बाब गंभीर स्वरुपाची असून समितीच्या निदेशाचे पालन करण्यात आले नसल्याचे समितीने गंभीर दखल घेतली आहे. तसेच त्यांच्यावर कारवाई करावयाची आहे त्यांनी शिक्षा सौम्य करावी अशी मागणी केली . तथापि, नियमानुसार काम न करता गैरव्यवहार करावयाचा आणि पुन्हा शिक्षा सौम्य करण्याची मागणी करायची आणि त्यावर जिल्हा परिषदेने कोणताही निर्णय न घेता प्रलंबित ठेवायचे. यामध्ये कार्यवाही करणारे अधिकारी व गैरव्यवहार करणारे अधिकारी/कर्मचारी यांचे संगनमत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

समिती अशी शिफारस करते की, गैरव्यवहार प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची कायम स्वरुपी वेतनवाढ थांबविण्यात यावी तसेच समितीने निदेश दिल्यानंतरही कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. ग्रामनिधीची प्रलंबित असलेली १८ प्रकरणे त्वरीत निकाली काढयात यावी. तसेच जवाहर रोजगार योजनेची जिल्हा परिषद स्तरावर प्रलंबित असलेली ११ प्रकरणे तसेच पंचायत समिती स्तरावर प्रलंबित असलेली १५ प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करुन निकाली काढण्यात यावी. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी.

ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या गैरव्यवहारास सरपंच/उपसरपंच जबाबदार असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती या संदर्भात शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २००५ रोजी परिपत्रक काढून राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक यांना पाठविण्यात आले आहे. सदरहू परिपत्रकात ग्राम पंचायतीच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता करणे अथवा गाम पंचायत मालमत्तेचा अथवा निधीचा अपहार करणे याकरीता जबाबदार असणारे सरपंच व उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायतीचा सचिव, ग्रामपंचायत कर्मचारी आणि इतर संबंधित व्यक्ती यांच्याकडून अपहारीत मालमत्ता/रक्कम वसुली बरोबरच त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुध्दा तातडीने करणे आवश्यक आहे. संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी असे गुन्हे तात्काळ नोंदवून घेणे आवश्यक आहे. याबाबत कोणताही निष्काळजीपणा निदर्शनास आल्यास अथवा अशा प्रकारची कार्यवाही सुरु करण्याच्या बाबतीत विलंब झाल्यास संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल असे नमूद केले आहे.

तथापि अद्याप कोणत्याही सरपंच/उपसरपंच यांचेवर कारवाई झाल्याचे निदर्शनास आलेली नाही. शासन या प्रकरणी दुर्लक्ष करीत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. **समिती अशी शिफारस करते की, उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे संबंधित सरपंच/उपसरपंच यांचेवर तातडीने कारवाई करण्यात यावी तसेच ज्यांच्याकडून अशी कारवाई होणार नाही त्यांना कर्तव्यात कसूर केल्याबाबत जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासंदर्भात तातडीने आदेश काढण्यात यावेत. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

ग्रामसेवकांकडून पैसे वसूल करु शकतो तथापि सरपंच/उपसरपंच व सदस्यांकडून शासकीय रक्कम वसूल करुन घेता येत नाही त्यामुळे सरपंचाकडून अनामत रकमेसारखी योजना आणली तर ते सोईचे होईल. **सरपंच/उपसरपंच किंवा सदस्यांनी शासकीय रकमेचा अपहार केला असेल तर त्याची माहिती निवडणुक आयोगाकडे पाठवून दिली तर पुढील कोणत्याही निवडणुकीत त्यांना सहभागी होता येणार नाही. याबाबत कायद्यामध्ये तरतूद करावी लागेल. त्यामुळे प्रशासनात होणाऱ्या गैरव्यवहारावर काही प्रमाणात अंकुश येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका सदस्यांना एक वर्ष किवां त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा झाली तर त्यांनाही अपात्र ठरवून निवडणूक लढविण्यावर बंदी आणावी. या प्रकरणी कायदयामध्ये बदल करणे आवश्यक असल्याने शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

जिल्हा परिषद ठाणे

२.४.१ अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्त्या शासनामार्फत करणेबाबत -

पंचायती राज समितीने दिनांक १६ ते १९ ऑक्टोबर २०१२ या कालावधीत ठाणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २००६-०७ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक बाबत दिनांक १९ ऑक्टोबर २०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. सदरहू प्रश्नावली मधील शालेय शिक्षण विभागाच्या प्रश्नांवर चर्चा चालू असताना समितीने अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्त्या करणेबाबतचा प्रश्न उपस्थित केला. यामध्ये अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांचा पगार शासनाकडून दिला जातो परंतु शिक्षकांची भरती संबंधित संस्थाकडून केली जाते याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी व समितीने शासनाकडे शिफारस करावी असा निर्णय घेण्यात आला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही जिल्हा परिषदांच्या शाळांप्रमाणे नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांचाही समावेश करण्यात यावा असे समितीस सांगितले.

२.४.२ उपरोक्त मुद्याच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषद व शासनाकडून खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.

१. राज्यातील अनुदानित खाजगी शाळांतील शिक्षकांचा पगार शासनाकडून दिला जातो मात्र शिक्षक भरती संचालक मंडळाकडून केली जाते तर उक्त शिक्षकांची भरती शासनाकडून करण्यासंबंधात शासनाची भुमिका काय आहे?

वरील प्रकरणी विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती देण्यात आली.

१. माध्यमिक शाळा संहितामधील नियम ६७.१ व ६७.२ नुसार खाजगी शाळांत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती करण्याचे अधिकार संबंधित संस्था व्यवस्थापनास आहेत.

तथापि, शासन निर्णय क्र. व्हीएलएस/१४१३/१४-१३ प्राशि-३ दिनांक ६ मे, २०१३ अन्वये यापुढे सर्व पदे शिक्षकीय पदासाठी विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा **TET (Teacher Eligibility Test)** उत्तीर्ण उमेदवारांमधुनच भरणे बंधनकारक राहील असे आदेशित करणेत आले आहे. उक्त पदे शासनाकडून भरणेबाबत भूमिका घेणे शासन स्तरावरील बाब आहे.

२.४.३ विभागीय सचिवांची साक्ष

विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक १२ नोव्हेंबर २०१३ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, राज्यातील अनुदानित खाजगी शाळांतील शिक्षकांचा पगार शासनाकडून दिला जातो मात्र शिक्षक भरती संचालक मंडळाकडून केली जाते तर उक्त शिक्षकांची भरती शासनाकडून करण्यासंबंधात शासनाची भूमिका काय आहे? यावर विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांचा पगार शासनामार्फत दिला जातो. मात्र शिक्षक भरती त्यांच्याकडूनच केली जाते. याबाबत शासनाची भूमिका अशी आहे की, केंद्र शासनाने २००९ मध्ये शिक्षण हक्क कायदा पारित केला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता केंद्र शासन ठरविणार असून त्याप्रमाणे सर्व राज्यांना ती बंधनकारक राहील. त्याप्रमाणे केंद्र शासनाने शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता त्याचबरोबर शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य केली आहे आणि राज्य शासनाने ती स्वीकारली आहे. पहिली परीक्षा १५ डिसेंबर, २०१३ रोजी होणार आहे. ही परिक्षा उत्तीर्ण केल्याशिवाय कोणीही पुरुष वा महिला शिक्षक होऊ शकत नाही. कोणीही शिक्षक होण्यासाठी इच्छुक

असला तरी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण् होणे बंधनकारक केले आहे. खाजगी शाळांच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला होता, त्या संस्थांमध्ये जे प्रकार सुरु होते ते बंद करण्यामध्ये मोठया प्रमाणात आळा बसणार आहे. यापुढे कोणतीही शाळा असो, मॅनेजमेंट असो, मंडळ असो, माध्यम असो, ज्या संस्थ्मेध्ये प्राथमिक शिक्षणाचे वर्ष सुरु आहे तेथे काम करण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारास शिक्षण पात्रता परीक्षा पास होणे बंधनकारक करण्यात आले आहे.

दुसरा मुद्दा खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती शासनामार्फत करावी किंवा कशी यामध्ये कायदेशीर बाब अंतर्भूत असून त्याचा अभ्यास सुरु असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

२.४.४ अभिप्राय व शिफारशी :-

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. राज्य शासनाने राज्यात सर्वत्र असणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापकामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथामिक व माध्यमिक शाळा असुन त्यामध्ये सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या १ लाख शाळांपैकी ३२५७३ शाळा खाजगी असून त्यामध्ये अनुदानित २०४५५ आणि विना अनुदानित १२०१८ इतक्या शाळा आहेत. केंद्र हा शासनाने घटनेत केलेल्या दुरुस्तीनुसार ६ ते १४ वयोगटातील इयत्ता १ ते ८ वी पर्यन्तच्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा त्यांचा मूलभूत अधिकार केला आहे त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण मिळण्याकरीता शिक्षकांच्या नियुक्तीसाठी शासनाने "शिक्षक पात्रता परिक्षा" अनिवार्य केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळून शिक्षणाचा दर्जा उंचावणार आहे. शालेय शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे समिती समाधान व्यक्त करते.

त्याचप्रमाणे वरील निर्णय हा वर्ग १ ते ८ पर्यन्तच्या विद्यार्थ्यांसाठी आहे तथापि, माध्यमिक शाळेसाठी अशा प्रकारचा कोणताही निर्णय नसल्याने शिक्षक भरती नेहमी प्रमाणे करण्यात येत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण मिळेल याची शाश्वती नाही. शिक्षकांचा दर्जा उच्च असेल तरच विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळेल सद्य: शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. शहरातील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना चांगल्या शिक्षणाचा लाभ मिळतो तथापि ग्रामीण भागात मुलभूत सुविधांची वाणवा असल्याने असे विद्यार्थी यापासून वंचित राहतात. वरील प्रमाणे ८ ते १० वी इयत्तेतील शिक्षकांना वरील प्रमाणे शिक्षक पात्रता परिक्षा लागू केल्यास चांगले व गुणवत्ता धारक व दर्जेदार शिक्षक मुलांसाठी उपलब्ध होतील त्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारेल. या अनुषंगाने ज्याप्रमाणे इयत्ता १ ते ८ पर्यन्तच्या इयत्तांना शिकवणाऱ्या शिक्षकांना शिक्षक पदावरील नियुक्तीसाठी "शिक्षक पात्रता परीक्षा" लागू करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर इयत्ता ८ ते १० पर्यन्तच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षकांनाही वरीलप्रमाणे शिक्षक पात्रता परीक्षा लागू करण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच राज्यातील अनुदानित शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत अनेक त्रुटी व तक्रारी असल्यामुळे सदरची भरती प्रक्रिया पारदर्शक होण्याच्या दृष्टीने शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.) प्रमाणेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी भरती प्रक्रिया अवलंबिण्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.

परिशिष्ट

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत

बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२
स्थळ : जिल्हा परिषद, सभागृह, गडचिरोली

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.विजय खडसे, वि.स.स.

४) श्री. बापूसाहेब पाठारे, वि.स.स.

५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८) श्री.संजय राठोड, वि.स.स.

९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित

१०) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय

श्री.शशिकांत साळुंखे, कक्ष अधिकारी

स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे कार्यालय

श्री.के.एम.विधाते, संचालक

जिल्हा परिषद, गडचिरोली

१) श्री.किरण गणेश कोवे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

२) श्री.विजय सु.कोळेकर, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी

३) डॉ.एफ.ए.मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी

४) डॉ.आशा गेडाम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

५) श्री.सी.ए. पुद्दटवार, प्रभारी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)

६) श्री.रा.सो.महाले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

७) श्रीमती पी.एम.आत्राम, समाज कल्याण अधिकारी

८) श्री.शामराव पा.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

९) श्री.सुधाकर खंगार, प्रभारी कार्यकारी अभियंता (सिंचन)

१०) श्री.बी.एन.राजनहिरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व निनंतर)

११) श्री.शिवशंकर भारसाकळे, प्रभारी प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा

१२) श्री.एस.आर.हळदे, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु)

१३) श्री.एस.वाय.वाघ, कार्यकारी अधिकारी (एमजेपी)

१४) श्री.व्ही.एस.महाजन, मोहिम अधिकारी (कृषी)

१५) श्री.दिपक नंदकुमार शिंदे, वरिष्ठ लेखा अधिकारी (वित्त विभाग)

१६) श्री.एन.आर.यिंतावार, उप अभियंता, पीएमजीएसवाय.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२

स्थळ : जिल्हा परिषद, गडचिरोली

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३) श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
४) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
५) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
६) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.
७) श्री.संजय राठोड, वि.स.स.
८) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

जिल्हा परिषदेचे अधिकारी :-

श्री.किरण कोवे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.के.खंगार, प्रभारी कार्यकारी अभियंता (सिंचन)
डॉ.ए.आर.गेडाम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
डॉ.एफ.ए.मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री.बी.एम.राजनहिरे, प्र.शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक व निरंतर)

पंचायत समिती, आरमोरी :-

श्री.आर.डी.निखाडे, गट विकास अधिकारी
श्री.एस.पी.कांबळे, प्रकल्प अधिकारी (एकात्मिक बालविकास योजना)
श्री.पी.पी.गणवीर, गट शिक्षणाधिकारी
डॉ.सुनील एल.मांडवी, तालुका वैद्यकीय अधिकारी
श्री.सावसागडे, विस्तार अधिकारी (पं.)
व इतर शाखा अभियंता, विस्तार अधिकारी व संबंधित अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

शुक्रवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, गडचिरोली

उपस्थिती :

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३) श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
४) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.
८) श्री.संजय राठोड, वि.स.स.
९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित

१०) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.शशिकांत साळुंखे, कक्ष अधिकारी

संचालक, (स्थानिक निधी लेखा) यांचे कार्यालय

श्री.एम.के.विधाते, संचालक

पंचायत समिती, भामरागड

श्री.ए.एम.इल्लुरकर, प्रभारी गट विकास अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी

श्री.पी.एम.सहारे, गट शिक्षणाधिकारी

श्री.पी.आर.केळकर, उप अभियंता

डॉ.एल.आर.कुकडे, तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित शाखा अभियंता व विस्तार अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने गडचिरोली जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील गडचिरोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ९ जुलै, २०१३
स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४) श्री.विजय खडसे, वि.स.स.

५) श्री.भाऊसाहेब कांबळे , वि.स.स.

६) श्री.दादाराव केचे, वि.स.स.

७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

८) श्री.संजय जाधव, वि.स.स.

९) श्री.संजय राठोड, वि.स.स.

१०) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.

११) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

१२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.

१४) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचे कार्यालय

श्री.के.एम.विधाते, संचालक

विभागीय प्रतिनिधी :

१) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग

२) श्री.उज्जव ऊके, प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग

३) श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग (रोहयो)

४) श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली

५) श्री.एस.बी.पेजलवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गडचिरोली

६) श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्राम विकास विभाग

७) श्री.ना.उ.रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

८) श्री.गिरीष भालेराव, सह संचालक (रा.ग्र.आ.अ.) सार्वजनिक आरोग्य विभाग

९) श्री.एस.व्ही.देशपांडे, सह संचालक (अभियांत्रिकी) जीएसडीए, पुणे

१०) श्री.एस.पी.कुंभार, कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.गडचिरोली

११) श्री. रामचंद्र श.जाधव, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

१२) श्री.गो.ग.आल्हाट, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

समितीने दिनांक ९ जुलै, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे गडचिरोली जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात गडचिरोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, प्रधान सचिव जलसंधारण (रोहयो) विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १० जुलै, २०१३
स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४) श्री.विजय खडसे, वि.स.स.
५) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
६) श्री.भारत भालके, वि.स.स.
७) श्री.बापुसाहेब पाठारे, वि.स.स.
८) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
९) श्री.संजय जाधव, वि.स.स.
१०) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.
१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे कार्यालय
श्री.के.एम.विधाते, संचालक

विभागीय प्रतिनिधी :
१) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग
२) श्री.रा.शं.जाधव, उप सचिव

जिल्हा परिषद, गडचिरोली :-
१) श्री.रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री.द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी (पा.पु.व स्व.)
३) श्री.श्री.वि.देशपांडे, सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
४) श्री.वि.दी.भालेराव, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ.

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या गडचिरोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा, परिषद गडचिरोली मुख्य अधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी (पा.पु.व स्व.)सह संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सह संचालक, रा.ग्रा.आ.अ. यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२

स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.
४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.उदय सामंत वि.स.स.
८) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
९) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
१०) श्री.अण्णा बनसोडे, वि.स.स.
११) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१२) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१३) श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
१४) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१५) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१६) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१७) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१८) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रित

२१) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय
श्री.के.एम.विधाते, संचालक

..२..

जिल्हा परिषद, ठाणे

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)

४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)

७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी

९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)

१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी

११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)

१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी

१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी

१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)

१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण

१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,

१७. श्री.आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)

१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर

१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू

२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर

२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई

२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा

२३. श्री.गणेश पिंपळे, गट विकास अधिकारी, विक्रमगड

२४. श्री.एन.पी.ओसवाल, गट विकास अधिकारी, तलासरी

२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ

२६. श्री.एस.एस.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने ठाणे जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह (आण्णासाहेब वर्तक सभागृह) ठाणे

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.
४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
८) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
९) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१०) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
११) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१२) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१३) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१४) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१५) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१६) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१७) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रित

१८) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

<u>ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई</u>
श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

<u>संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय</u>
श्री.के.एम.विधाते, संचालक

<u>जिल्हा परिषद, ठाणे</u>

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)

४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी
९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)
१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी
११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)
१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी
१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी
१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)
१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण
१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,
१७. आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)
१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर
१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू
२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर
२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई
२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा
२३. श्री.गणेश पिंपळे गट विकास अधिकारी, विक्रमगड
२४. श्री.एन.पी.ओसवाल गट विकास अधिकारी, तलासरी
२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ
२६. श्री.एस.एस.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२
स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.वैजनाथ शिंदे वि.स.स.

४) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५) श्री.विजय खडसे, वि.स.स.
६) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७) श्री.उदय सामंत वि.स.स.
८) श्री.सुरेश लाड, वि.स.स.
९) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
१०) श्री.अण्णा बनसोडे, वि.स.स.
११) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१२) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१३) श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
१४) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१५) श्री.संजय राठोड, वि.स.स.
१६) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१७) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
१८) डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
१९) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रित

२१) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

पंचायत समिती, भिवंडी

१) श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे

२) श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी

३) श्री.डी.एस.पवार, कार्यकारी अभियंता

४) श्री.वि.एम.देवराज, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे

५) श्री.आर.डी.चव्हाण, उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

६) श्री.एम.के.शहा, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा

७) श्री.आर.वि.प्रभाकर, उप विभागीय अधिकारी, पाटबंधारे

८) श्री.शिरसाठ, सिडीपीओ

९) डॉ.प्रवीण रसाळ, ता. आरोग्य अधिकारी

१०) सौ.कुंदा सुधाकर पाटील, प्रभारी गट विकास अधिकारी

११) श्री.ए.डी.दोडके, कृषी अधिकारी

१२) श्री.एन.व्ही.भोये, उप अभियंता, बांधकाम

१३) श्री.गिते, शाखा अभियंता, बांधकाम

१४) श्री.एम.एस.बोंडे, बा.वि.प्र.अं.

१५) श्री. के.एस. साळवे, क.ले.अ.

१६) डॉ.एस.एस.सिंह, प.वि.अ. (वि.)

१७) श्री.आर.एस.नाळे, उप अभियंता

१८) श्री.दिपक कुटे, जिल्हा कृषी अधिकारी

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२

स्थळ : जिल्हा परिषदेच्या आण्णासाहेब वर्तक सभागृह, ठाणे

<u>उपस्थिती</u>

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.

३) श्री.विजय खडसे, वि.स.स.
४) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
५) श्री.बापूसाहेब पाठारे, वि.स.स.
६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
८) श्री.संजय राठोड, वि.स.स.
९) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१०) श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रित

१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२. श्री.जी.डी.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
३. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.राजेंद्र गेंगले, अवर सचिव

संचालक स्थानिक निधी (लेखा) यांचे कार्यालय

श्री.के.एम.विधाते, संचालक

जिल्हा परिषद, ठाणे

१. श्री.किरण कुरुंदकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अंकुश बगाटे, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.)
४. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
५. श्री.दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
६. श्री.मधुकर वायंगणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप)
७. डॉ.श्रीमती सुचरीता थोरात-गागरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
८. श्री.आर.एफ.नाईकवाडी, जिल्हा अधिक्षक, कृषी

९. श्री.अशोक मिसाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (प्रभारी)
१०. डॉ.रावजी कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी
११. श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता बांधकाम (पश्चिम)
१२. श्री.सुभाष घाडगे, कृषी विकास अधिकारी
१३. श्रीमती सलीमा तडवी, समाज कल्याण अधिकारी
१४. श्री.सुभाष पाटील, उप शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान (प्रभारी)
१५. श्री.टी.ओ.चव्हाण, गट विकास अधिकारी, कल्याण
१६. श्री.अशोक पाटील, गट विकास अधिकारी, भिवंडी,
१७. आर.ए.अवचार, गट विकास अधिकारी,मुरबाड (प्रभारी)
१८. श्रीमती एन.एस.आप्रे, गट विकास अधिकारी, पालघर
१९. श्री.यु.जे.आसवले, गट विकास अधिकारी, डहाणू
२०. श्रीमती के.डी.जुईलकर, गट विकास अधिकारी, शहापूर
२१. श्री.ए.व्ही.धुळे, गट विकास अधिकारी, वसई
२२. श्री.राहूल धूम, गट विकास अधिकारी, वाडा
२३. श्री.गणेश पिंपळे, गट विकास अधिकारी, विक्रमगड
२४. श्री.एन.पी.ओसवाल, गट विकास अधिकारी, तलासरी
२५. श्री.प्रमोद गोडांबे, गट विकास अधिकारी,अंबरनाथ
२६. श्री.एस.ए.भोये, बालविकास प्रकल्प अधिकारी, अंबरनाथ

<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>

समितीने ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २६ जून, २०१३

स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.सुरेशभाऊ कांबळे, वि.स.स.
४) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
६) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
७) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
८) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
९) श्री.संजय जाधव, वि.स.स.
१०) श्री.संजय राठोड, वि.स.स.
११) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
१३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित

१४) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव

स्थानिक निधी लेखा परिक्षण

१) श्री.के.एम.विधाते, संचालक

ठाणे जिल्हा परिषद :-

१. श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी
३. श्री.संजय पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

विभागीय प्रतिनिधी

१) श्री.टी.सी.बेजामीन, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

२) श्री.स्वाधिन क्षेत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग,

३) डॉ.सुधीर गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग (कृषी व पणन)

४) श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग

५) श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास पचांयती राज) विभाग

६) श्री.उज्जवल उके, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग

७) श्री. प्रवीण परदेशी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

८) श्री. एस.के.मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

९) श्री. द.चि.सुर्यवंशी, मुख्य अधिकारी तथा विकास कार्य अधिकारी

१०) डॉ. मल्लिनाथ कळशेट्टी, उप सचिव, ग्राम विकास विभाग

११) श्री. ना.ना.रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००६-०७ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग, अप्पर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास (पंचायत राज) विभाग, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अधिकारी तथा विकास कार्य अधिकारी उप सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांची साक्ष घेतली.

.

गुरुवार, दिनांक २७ जून, २०१३,
स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

उपस्थिती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशीराम पावरा, वि.स.स.
३) श्री.सुरेशभाऊ कांबळे, वि.स.स.
४) श्री.भारत भालके, वि.स.स.
५) श्री.दादाराव केचे, वि.स.स.
६) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
८) श्री.संजय जाधव, वि.स.स.
९) श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१०) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
११) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१२) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
१३) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

विभागीय प्रतिनिधी

१) श्री.एस.एस.संधू प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,
२) श्री.आर.डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय विभाग,
३) श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषी व पदुम विभाग
४) श्री.नाना रौराळे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग
५) श्री.शेखर गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
६) श्री.रविंद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
७) श्री.सं.प्र.पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे
८) श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) जिल्हा परिषद, ठाणे

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिलहा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभ्ांग, सचिव कृषी व पदुम विभ्ांग सह सचिव, शालेय शिक्षण विभ्ांग मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. ठाणे तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प) जि.प. ठाणे यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३
स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

उपस्थिती

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
४. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५. श्री.संजय भेगडे, वि.स.स.
६. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
७. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
८. श्री.संजय राठोड, वि.स.स.
९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१०. श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
११. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.विलास आठवले, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई

श्री.के.एम.विधाते, संचालक

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.ज.स.सहारिया, अतिरिक्त मुख्य सचिव
श्री.रा.रा.रौराळे, सह सचिव

ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव
श्री.एकनाथ मोरे, उप सचिव
डॉ.मल्लिनाथ कलशेटट्टी, उप सचिव
श्री.न.म.शिंदे, उप सचिव

जिल्हा परिषद, ठाणे

श्री.रविंद्र पाटील, मुख्य/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.अशोक पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री.एस.पी.पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्रीमती रुपा राऊळ-गिरासे, कार्यकारी अभियंता, जि.प.ठाणे

श्री.पी.एल.कवाते, शिक्षणाधिकारी

श्रीमती सलीमा तडवी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००६-२००७ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव,ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे, उप मुख्य कार्यक्ारी अधिक्ारी, जि.प. ठाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. ठाणे कार्यकारी अभियंता, जि.प. ठाणे, शिक्षणाधिकारी जि.प. ठाणे व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प. ठाणे यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१३
स्थळ विधान भवन, नागपूर.

समिती प्रमुख

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.भारत भालके, वि.स.स.
६. श्री. भिमराव तापकीर वि.स.स.
७. श्री. राजकुमार बडोले वि.स.स.
८. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स
९. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

निमंत्रित

१०. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव

श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

श्री.दिनकर कांबळे, कक्ष अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने बैठकीत पंधराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत करण्यात आला.